दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज


मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ सोमवार, दि.१७ मार्च २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १५४ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

बीडमध्ये आश्रम शाळेवरील शिक्षकाची आत्महत्या: सहा जणांच्या नावाची सुसाईड नोट

छत्रपती संभाजीनगर : बीड येथील कृष्णा अर्बन बँकेच्या परिसरात एका शिक्षकाने आत्महत्या केल्याची घटना शनिवारी उघडकीस आली. मृताचे नाव धनंजय नागरगोजे असे असून, ते केज तालुक्यातील केळगाव



येथील विना अनुदानित आश्रम शाळेत मागील १८ वर्षांपासून कार्यरत होते. धनंजय नागरगोजे यांनी आत्महत्येपूर्वी आपल्या तीन वर्षाच्या मुलीला एक चिठ्ठी लिहून आश्रमशाळेशी संबंधित सहा जणांच्या छळामुळे आत्महत्या करीत असल्याचे कारण नमूद केले आहे. या प्रकरणी बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक मारूती खेडकर यांच्याकडून सांगण्यात आले की, घटनेची अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अद्याप कोणावरही गुन्हा दाखल नसून, त्या संदर्भाने तक्रार आली तर पोलीस पुढील कारवाई करतील. धनंजय नागरगोजे यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करून पार्थिव नातेवाईकांच्या ताब्यात दिले आहे.

'संतांच्या केसालाही धक्का लागू देणार नाही' : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

वृत्तसंस्था ■ पुणे

देहू : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना श्री संत तुकाराम महाराज पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या ३७५ व्या बीज सोहळ्यानिमित्त हा विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. यावेळी देहू संस्थान चे विश्वस्त उपस्थित होते. त्यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तुकाराम बीज निमित्त आज लाखो वारकरी देहूत दाखल झाले आहेत.

तुकोबांची पगडी, शाल, श्रीफळ, पुष्पहार, चिपळ्या, संत तुकाराम महाराज मूर्ती, संत गाथा आणि सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. शिंदे यांनी पंढरपूर वारीदरम्यान वारकऱ्यांच्या सेवा-सुविधांसाठी घेतलेल्या विशेष प्रयत्नांची आणि 'निर्मल वारी, हरित वारी' संकल्पनेत दिलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. त्यांनी पालखी सोहळ्यातील दिंड्यांना आर्थिक सहाय्य, स्वच्छता मोहिमा आणि इतर सेवा- सुविधांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. हा सन्मान २५ वर्षांपूर्वी माजी मुख्यमंत्री शरद पवार यांना देण्यात आला होता. आज जगद्गुरू तुकोबांचा ३७५ वा सदेह वैकुंठ



गमन सोहळा आहे. दुपारी ठीक बारा वाजता कीर्तन झाल्यानंतर नांदूरकीच्या झाडावर वारकरी पुष्प अर्पण करताच हा सोहळा पार पडेल.

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. शूर वीरांची भूमी आहे. महाराष्ट्रात संतांच्या केसालाही धक्का लागू देणार नाही. हा एकनाथ शिंदें चा शब्द आहे. धर्माचे रक्षण करणं जस आपलं कर्तव्य आहे. तसेच नद्या प्रदूषण मुक्त करण आपलं काम आहे. असं मत राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केल आहे. ते देहू मध्ये बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देहू संस्थान कडून श्री संत तुकाराम महाराज पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. त्यानंतर ते वारकऱ्यांना संबोधित करत होते. यावेळी त्यांनी देहू संस्थान आणि वारकऱ्यांचे विशेष आभार मानले.

एकनाथ शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांना तुकोबांच मार्गदर्शन होत. आशीर्वाद होता. देहूच्या पवित्र भूमीत छत्रपती शिवाजी महाराज हे संत तुकोबांच्या भेटीला आले होते. पुढे ते म्हणाले, संत तुकोबांच्या रचना आपल्या जगण्यावर भाष्य करतात. ३७५ वर्षानंतर ही त्या काल बाह्य झालेल्या नाहीत. पुढील ३७५ वर्ष च नव्हे तर ३,३७५ वर्ष या रंचनांमधील मधील अर्थ लोप पावणार नाहीत. तुकोबांनी चारशे वर्षांपूर्वी क्लिष्ट अस तत्वज्ञान हे सोप्या मराठीत सांगितलं. हाच मराठीचा अभिजात दर्जा होता. अस मत त्यांनी व्यक्त केलं. तुकाराम महाराजांच्या शिकवणी प्रमाणे आम्ही शांततेने काम करत आहोत. मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात काय- काय केलं हे सर्वांना परिचित आहे. ते माझं कर्तव्य होत. वारकऱ्यांपेक्षा कुणी मोठं नाही.

वारकरी हा समाज प्रबोधनकार आहे. तुम्ही एकदा मनावर घेतल की काय होऊ शकतं, हे तीन महिन्यांपूर्वी पाहिलं आहे. पुढे ते म्हणाले, महाराष्ट्र ही संतांची, शूरवीरांची भूमी आहे. महाराष्ट्रात संतांच्या केसाला ही धक्का लागू देणार नाही. हा एकनाथ शिंदेंचा शब्द आहे. धर्माच रक्षण करण आपल्या सर्वांच कर्तव्य आहे. त्याच प्रमाणे इंद्रायणी, चंद्रभागा, गोदावरी या नद्यांची रक्षण करणं आपली जबाबदारी आहे. नद्यांची परिस्थिती बरी नाही. प्रदूषण मुक्तीची लोक चळवळ झाली पाहिजे. आदर्श नद्या बनल्या पाहिजेत. अस मत ही शिंदे यांनी व्यक्त केलं आहे.

बिबट्याचे कातडे विक्री प्रकरणी दोघांना अटक



वृत्तसंस्था ■ कोल्हापूर

कोल्हापूर : बिबट्याचे कातडे विकण्यासाठी आलेल्या दोघांना स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेच्या पथकाने येथे सापळा रचून अटक केली आहे. धाकलू बाळू शिंदे (वय ६५, हेरे) व बाबू सखाराम डोईफोडे (५७, बांदराई धनगरवाडा) अशी चंदगड तालुक्यातील या दोघांची नावे आहेत.

दोघेजण बिबट्याचे कातडे विकण्यासाठी कोल्हापूर शहरातील तपोवन मैदानात येणार असल्याची माहिती शिपाई योगेश गोसावी यांना मिळाली होती. त्यानुसार तेथे सापळा रचण्यात आला होता. तेथे बिबट्याचे कातडे विक्रीसाठी घेऊन आलेल्या वरील दोघांना पोलिसांनी पकडले.

त्यांच्याकडील बिबट्याचे कातडे जप्त केले. जुना राजवाद पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून, त्यांना अटक करण्यात आली आहे. संशयितांनी बिबट्यासह आणखी कोणाची शिकार केली आहे का, वन्य प्राण्यांच्या अवयवांची तस्करी होत आहे का, याचाही शोध घेतला जात आहे.

किरकोळ वादातून गुलटेकडीत दोन गटात हाणामारी, मारहाणीत तिघे जखमी

वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : किरकोळ वादातून दोन गटात हाणामारी झाल्याची घटना गुलटेकडीतील मीनाताई ठाकरे वसाहतीत घडली. याप्रकरणी परस्परविरोधी फिर्यादीनुसार खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, दोघांना अटक करण्यात आली आहे. मारहाणीत तिघे जखमी झाले असून, पसार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

याबाबत केशव अनिल शिवशरण (वय २०, रा. मीनाताई ठाकरे वसाहत, गुलटेकडी) याने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, रोहित सिंग, दर्शन सुतार, संकेत यांच्यासह पाच ते सहा जणांविरुद्ध गुन्हा



दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी रोहित सिंग याला अटक करण्यात आली असून, आरोपींविरुद्ध यापूर्वी गुन्हे दाखल झाले असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. आरोपींनी केलेल्या मारहाणीत शिवशरण, राहुल ढोणे, अक्षय कांबळे हे जखमी झाले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आणि तक्रारदार शिवशरण हे मीनाताई ठाकरे वसाहतीत राहायला आहेत. शुक्रवारी (१४ मार्च) सायंकाळी शिवशरण याने आरोपी सिंग याला दुचाकी बाजूला घेण्यास सांगितले. या कारणावरुन त्यांच्यात वाद झाला. या घटनेनंतर सिंग, सुतार आणि साथीदार तेथे आले. त्यांच्याकडे कोयते, बांबू होते. कोयते उगारून आरोपींनी दहशत माजविली. आरोपींनी शिवशरण, ढोणे, कांबळे यांना मारहाण केली. मारहाणीत तिघे जखमी झाले. सहायक पोलीस निरीक्षक राहुल कोलंबीकर तपास करत आहेत.

दरम्यान, रोहित सिंग (वय २८, रा. मीनाताई ठाकरे वसाहत, गुलटेकडी) याने परस्परविरोधी फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, अभय शेखापुरे, सचिन खुडे, सागर कदम, संतोष कांबळे यांच्यासह सात ते आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी आरोपी सागर कदम याला अटक करण्यात आली आहे. आरोपींनी केलेल्या मारहाणीत दर्शन सुतार, संदेश मेश्राम जखमी झाले आहेत. सचिन माने याच्याबरोबर का फिरतो, अशी विचारणा करुन आरोपींनी मारहाण केली. आरोपींनी बांबू आणि फरशीच्या तुकड्याने मारहाण केली. मारहाणीचा प्रकार सुरू असताना भाचा दर्शन सुतार, संदेश मेश्राम तेथे आले. तेव्हा आरोपींनी त्यांना मारहाण केल्याचे सिंग याने फिर्यादीत म्हटले आहे.

मीनाताई ठाकरे वसाहतीत दोन गटात हाणामारी झाल्याची माहिती मिळताच परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील, सहायक आयुक्त राहुल आवारे यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेल्या दोन्ही गटातील तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याबरोबर असलेल्या साथीदारांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

सायबर चोरट्यांकडून ५६ लाखांची फसवणूक

वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने फसवणूक करण्याचे सत्र सुरू आहे. चोरट्यांनी गुंतवणुकीच्या आमिषाने वेगवेगळ्या घटनेत तिघांची ५६ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने सायबर चोरट्यांनी मगरपट्टा सिटी भागातील एकाची ४५ लाख ४० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी सायबर चोरट्यांविरुद्ध हडपसर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एकाने हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण मगरपट्टा सिटी भागात राहायला आहेत.



चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर गेल्या वर्षी संपर्क साधला होता. शेअर बाजारात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळेल, असे आमिष चोरट्यांनी त्यांना दाखविले होते.

चोरट्यांच्या खात्यावर तरुणाने रक्कम जमा केली. सुरुवातीला तरुणाला परतावा देण्यात आला. त्यानंतर तरुणाने चोरट्यांच्या बतावणीवर विश्वास ठेऊन आणखी रक्कम गुंतविली. गेल्या सहा महिन्यात चोरट्यांच्या खात्यावर तरुणाने वेळोवेळी ४५ लाख ४० हजार रुपये जमा केले. तरुणाने पैसे गुंतविल्यानंतर परताावा देण्यात आला नाही. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर तरुणाने नुकतीच पोलिसांकडे तक्रार दिली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नीलेश जगदाळे तपास करत आहेत.

शेअर बाजारात गुंतवणुकीच्या आमिषाने कात्रज भागातील एकाची चोरट्यांनी सहा लाख ३० हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावळाराम साळगावकर तपास करत आहेत. अशाच पद्धतीने चोरट्यांनी धनकवडी भागातील एका तरुणाची सहा लाख सात हजार रुपयांची फसवणूक केली. सहकारनगर पोलिसांनी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल गौड तपास करत आहेत.

कारवाईची धमकी देऊन ज्येष्ठाची फसवणूक

सक्तवसुली अंमलबजावणी संचनालय (ईडी), नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (एनसीबी), तसेच केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (सीबीआय) कडून कारवाई करण्यात येणार असल्याची भीती दाखवून फसवणूक करण्याचे सत्र सुरू आहे. चोरट्यांनी आंबेगाव बुद्रुक परिसरातील एका ज्येष्ठ नागरिकाला कारवाईची धमकी देऊन साडेसहा लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला.


याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चोरट्यांनी ज्येष्ठ नागरिकाच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला होता. काळ्या पैसा व्यवहारात बँक खात्याचा वापर करण्यात आला असून, या प्रकरणात अटक करण्यात येणार आहे, अशी धमकी चोरट्यांनी त्यांना दिली. चोरट्यांनी कारवाईची भीती दाखवून तातडीने पैसे भरण्यास सांगितले. चोरट्यांच्या खात्यात त्यांनी पैसे जमा केले. फसवणक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावळाराम साळगावकर तपास करत आहेत.

'टोरेस'च्या सील केलेल्या शोरूममध्ये चोरीचा प्रयत्न

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : गावदेवी परिसरातील 'टोरेस'च्या सील केलेल्या शोरूममध्ये चोरीचा प्रयत्न झाल्याचा प्रकार घडला आहे. टोरेस प्रकरणात तपास करणाऱ्या आर्थिक गुन्हे शाखेने गावदेवीमधील संबधीत शोरूम ७ मार्च २०२५ ला सील केले होते. चोरीचा प्रयत्न केल्याप्रकरणी गावदेवी पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या शोरूमच्या शेजारचे दुकानही अनोळखी चोरट्याने फोडले आहे. याप्रकरणी पोलीस सीसीटीव्हीच्या मदतीने तपास करत आहेत.

आर्थिक गुन्हे शाखेतील सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक श्रीधर शंकर राव भोईटे (५६) यांनी तक्रार केली आहे. तक्रारीनुसार, ते आणि त्यांची



पथक, पोलीस निरीक्षक रमेश यादव यांच्यासोबत, शुक्रवारी सकाळी १० वाजता सील केलेल्या शोरूमजवळ गेले. तेथे पोहोचल्यावर शोरूमला लावलेली सील तोडून लोखंडी शटर उघडलेले दिसले. भोईटे यांनी त्वरित आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली. या शोरूमच्या शेजारी असलेल्या दुचाकीचे शटरचे टाळेही फोडण्यात आले आहे. त्यामुळे या प्रकरणी सराईत आरोपीचा सहभाग असल्याचा पोलिसांना संशय आहे.

गुंतवणूकदारांचे नुकसान

टोरेस गैरव्यवहारात मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि मीरा-भाईंदर या भागांतील हजारो गुंतवणूकदारांचे या प्रकरणात कोट्यवधींचे नुकसान झाले आहे. हा संपूर्ण कट युक्रेन देशातील नागरिक असलेल्या मुख्य आरोपीने रचला होता. या प्रकरणात आरोपी असलेले युक्रेन देशाचे आठ नागरिक आणि एक तुर्कस्तान देशाचा नागरिक सध्या फरार आहेत. टोरेस प्रकरणातील मुख्य सूत्रधाराने गैरव्यवहारातील २०० कोटी रुपये परदेशात पाठवल्याचा संशय आहे.

जलयुक्त शिवार अभियानात सामाजिक संस्थांचा सहभाग;राज्यशासन आणि ए.टी.ई. चंद्रा फौंडेशन यांच्यात सामंजस्य करार

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : राज्यात 'जलयुक्त शिवार योजना-२' अंतर्गत 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजना राबवण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून धरणांमधील पाणीसाठा वाढण्यासोबतच शेतीची सुपिकता वाढण्यासही मोठ्या प्रमाणावर मदत होत आहे. या योजनेतील सहभाग आणि प्रभावी अंमलबजावणीबाबत ए.टी.ई.चंद्रा फौंडेशन आणि मृद आणि जलसंधारण विभाग यांच्यात सामंजस्य करार (श्दळ) करण्यात आला आहे.

गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची एक महत्वाकांक्षी योजना आहे. यामध्ये सामाजिक संस्था काम करण्यासाठी उत्सुक



आहेत. ए.टी.ई. चंद्रा फौंडेशन सक्रीय सहभागी होणार असल्यामुळे राज्यातील पाण्याची उपलब्धता वाढवण्यासोबतच जमिनीची सुपिकता वाढून शेतकऱ्यांच्या उत्पादनामध्येही चांगली वाढ होण्यात मदत होणार आहे. तसेच या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये मृद व जलसंधारण विभागाने फौंडेशनला सहकार्य करावे अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी विभागाला दिल्या आहेत.

अवनी ग्रामीण ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन डेटाचे संकलन आणि नियंत्रण

या सामंजस्य करारानुसार या योजनेसाठी ए.टी.ई. चंद्रा फौंडेशन तांत्रिक सहाय्यासह, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष मनुष्यबळ सहाय्य उपलब्ध करून देणार आहे. फौंडेशनच्या वतीने विकसित करण्यात आलेल्या अवनी ग्रामीण ?पच्या माध्यमातून योजनेतील कामांच्या डेटाचे संकलन आणि नियंत्रण करण्यात येणार आहे. तसेच फौंडेशनमार्फत स्वयंसेवी संस्थांमध्ये नियुक्त करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना अवनी ग्रामीण ॲप संदर्भातील प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

जलसाठ्यामध्ये वाढ आणि जमिनीची सुपिकता

'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजना हा राज्यातील महत्वकांक्षी प्रकल्प आहे. यामध्ये धरणे व तलाव गाळमुक्त करुन तो गाळ शेत जमिनीमध्ये टाकण्यात येतो. त्यामुळे जलसाठ्यामध्ये वाढ होते आणि जमिनीची सुपिकताही वाढते. गेल्या दोन वर्षात राज्यात दीड हजारपेक्षा जास्त जलस्त्रोतातून सुमारे साडेचार कोटी घनमीटर गाळ काढण्यात आला असून सुमारे चाळीस हजार शेतकऱ्यांनी हा गाळ शेतीमध्ये टाकला आहे. राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये सुमारे ९ कोटी घनमीटर गाळ उपसण्याची क्षमता असून १.८ लाखांहून अधिक शेतकरी गाळ वाहून नेणार आहेत. हे काम सध्या वेगाने सुरू आहे. 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही एक अभिनव योजना असून फिलॅन्ट्रॉपीक संस्था, शासकीय विभाग आणि स्थानिक समुदाय यांना एकत्र आणते, हा एक मोठा सहभागात्मक उपक्रम आहे.

जलयुक्त शिवार अभियान हा महाराष्ट्र सरकारचा महत्त्वाकांक्षी उपक्रम

जलयुक्त शिवार अभियान हा महाराष्ट्र सरकारचा एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे, राज्यातील दुष्काळग्रस्त भागांमध्ये जलसंधारण आणि जलव्यवस्थापन सुधारण्यासाठी राबविण्यात आला. २०१५ साली सुरू झालेल्या या अभियानाचा मुख्य उद्देश भूजल पातळी वाढवणे, शाश्वत सिंचन सुविधा निर्माण करणे आणि पावसाच्या पाण्याचे प्रभावी पुनर्भरण करणे हा होता. या अभियानांतर्गत जलसंधारणाच्या विविध उपाययोजना जसे की छोटे बंधारे, नाला खोलीकरण, जलकुंभ, मातीकाम, वृक्षारोपण आणि शेततळे यांचा समावेश करण्यात आला. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या तत्त्वावर आधारित हे अभियान स्थानिक लोकसहभागाच्या जोरावर राबविण्यात आले. महाराष्ट्रातील अनेक गावांमध्ये यामुळे जलसाठा वाढून शेतीसाठी पाण्याची उपलब्धता सुधारली आणि दुष्काळावर मात करण्यास मदत झाली.

आरडब्ल्यूबी भारताच्या जल आव्हानांवर एक किफायतशीर उपाय

भारतातील जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी (आरडब्ल्यूबी) समुदाय-नेतृत्वाखालील, तंत्रज्ञान-सक्षम मॉडेल ग्रामीण जलसुरक्षा वाढविण्यासाठी महत्त्वाचा हस्तक्षेप आहे. संमिश्र भू-वापर पुनर्संचयित आणि मूल्यांकन साधन (सीएलएआरटी जीआयएस) आणि एव्हीएनआय ग्रामीण ॲप भूजल पुनर्भरणाची क्षमता असलेल्या जलस्रोतांची ओळख पटवू शकतात आणि शेतकरी स्तरावर भौगोलिक-टॅग केलेल्या प्रतिमा आणि पडताळणीद्वारे जलस्रोत पुनर्संचयित करण्यासाठी अशा हस्तक्षेपांचे निरीक्षण करण्यास सक्षम करू शकतात. म्हणूनच, आरडब्ल्यूबी भारताच्या जल आव्हानांवर एक किफायतशीर उपाय आहे.

अमृत सरोवर मॉडेल

अमृत सरोवर हा उपक्रम बराच अंशी 'गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार' या उपक्रमावर आधारित आहे. अमृत सरोवर मॉडेल भारत सरकारचा जलसंधारण आणि जलाशय पुनरुज्जीवनासाठीचा उपक्रम आहे, जो 'आजादी का अमृत महोत्सव' अंतर्गत सुरू करण्यात आला. या मॉडेलचा उद्देश ग्रामीण भागातील पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुत्थान करून भूजल पातळी वाढवणे आणि पर्यावरण सुधारणा करणे आहे. यासाठी स्थानिक प्रशासन, ग्रामपंचायती आणि नागरिकांची सक्रिय भागीदारी घेतली जाते. मनरेगा आणि अन्य सरकारी योजनांच्या मदतीने जिल्ह्यात किमान ७५ अमृत सरोवर विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यामुळे जलसंधारणासह शेती आणि पशुपालनालाही चालना मिळेल, तसेच ग्रामीण भागातील जलस्वावलंबन वाढेल.

संपादकीय...

उभी आणि आडवीही...

...हे कसे करायचे हे संबंधित तज्ज्ञ सांगू शकतात. पण त्यासाठी तज्ज्ञांचे ऐकण्याची वृत्ती हवी आणि नियतही साफ हवी. मतदारसंघ पुनर्रचनेची घटनात्मकताही पूर्ण करायची असेल आणि दक्षिणेतील राज्येही बरोबर घ्यायची असतील तर केंद्रास काहीएक मध्यममार्ग काढावा लागणार. तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टालिन यांच्या पुढाकाराखालील बैठकीत मतदारसंघ पुनर्रचना (डिलिमिटेशन) फेटाळली गेली, हे अपेक्षेप्रमाणेच झाले. आणखी दोन वर्षांनंतर ही राष्ट्रव्यापी मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रिया सुरू होऊ शकेल. राज्यघटनेच्या कलम ८२ नुसार ही मतदारसंघ पुनर्रचना वेळोवेळी करणे बंधनकारक आहे. याआधी १९५२, १९६२ आणि १९७२ साली हे झाले आणि १९७६ साली घटनादुरुस्तीनंतर त्या वेळची मतदारसंघ पुनर्रचना २००१ पर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय झाला. त्या वर्षी ही मुदत आणखी २५ वर्षे वाढवण्यात आली. म्हणजे २०२६ साली ती संपेल. पण याआधीच्या मतदारसंघ पुनर्रचना या जनगणनेनंतर झाल्या. तथापि विद्यमान सरकारने २०२१ साली जनगणना सुरूच केली नाही. त्या वर्षी करोना महासाथ हे कारण दिले गेले. ते किती योग्य/अयोग्य हे साऱ्या देशाने अनुभवलेले असल्याने त्याची पुन्हा चर्चा करण्याचे कारण नाही. तेव्हा रखड(व)लेली जनगणना अद्याप सुरू झालेली नाही. ती कधी सुरू होईल याची घोषणा नाही. आणि तरीही त्यानंतर करावयाच्या मतदारसंघ पुनर्रचनेवर राजकीय हवा तापू लागली असून हे राजकारण अनाठायी ठरवणे अवघड. याचे कारण या मतदारसंघ पुनर्रचनेत लोकसंख्या हा कळीचा मुद्दा असेल. या मुद्द्यावर दक्षिणेतील राज्यांनी चांगली कामगिरी- म्हणजे लोकसंख्या नियंत्रण- केलेली असल्याने त्या राज्यांतून लोकसभेत पाठवल्या जाणाऱ्या प्रतिनिधींची संख्या कमी होईल. त्याच वेळी लोकसंख्या वृद्धीच्या मुद्द्यावर उत्तरेतील राज्यांनी सतत चांगली कामगिरी- म्हणजे सढळ लोकसंख्या वाढ- केलेली असल्याने त्या राज्यांतील लोकप्रतिनिधींची संख्या वाढणार. म्हणजे शहाण्यासारख्या वागणाऱ्यांस शिक्षा आणि बेजबाबदारांस उत्तेजन! ते दक्षिणी राज्यांस मान्य होणे अशक्यच. त्यामुळे या विरोधात तेथे आतापासूनच संताप दाटू लागल्याचे दिसते. तमिळनाडूतील आगामी विधानसभा निवडणूक लक्षात घेता त्या संतापाचे रूपांतर जनपाठिंब्यात करण्याचा प्रयत्न स्टालिन करणे साहजिक. तथापि राजकीय निकड हा मुद्दा दूर ठेवून मतदारसंघ पुनर्रचना या विषयाचा वेध घेणे गरजेचे आहे. त्यासाठी कोणी किती अपत्ये जन्मास घातली याचे प्रमाण ठरवणारा 'एकूण जनन दर' (टोटल फर्टिलिटी रेट, टीएफटी) हा घटक लक्षात घ्यायला हवा. टीएफटी म्हणजे एखादी महिला जास्तीत जास्त किती अपत्यांस जन्म देते त्याचे प्रमाण. हा जनन दर देश पातळीवर समान नाही. तो आर्थिक /सामाजिक/ भौगोलिक इत्यादी घटकांनुसार बदलतो. म्हणजे केरळमधील जनन दर सर्वात कमी म्हणजे १.५६ इतका आहे तर बिहारात ते प्रमाण सर्वाधिक म्हणजे ३.४१ इतके आहे. जाता जाता लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे या दोन्ही राज्यांत मुसलमानांचे प्रमाण लक्षणीय आहे. पण तरी जनन दर भिन्न. म्हणजे जनन दर हा धर्मावर आधारित नाही, हे स्पष्ट व्हावे. असो. तेव्हा ही आकडेवारी लक्षात घेतल्यास दक्षिणेतील राज्यांची लोकसंख्या कमी होत गेली तर उत्तरेकडील राज्यांतील मनुष्यसंख्या मोठ्या प्रमाणावर या काळात वाढली. लोकसंख्या स्थिर राहण्यासाठी जनन दर २.१ इतका तरी असावा लागतो. तरच मृत्यू आणि जन्म दरांमध्ये समतोल राखला जातो. सद्यःस्थितीत देशातील फक्त पाच राज्यांतील जनन दर २.१ पेक्षा अधिक आहे. यात आघाडीवर अर्थातच आहे बिहार. मग उत्तर प्रदेश, झारखंड आणि दोन पूर्वेकडील राज्ये- मेघालय आणि मणिपूर. या जनन दर फरकामुळे लोकसभेतील प्रतिनिधित्वाबाबत एक असंतुलनही घडून येते. म्हणजे केरळसारख्या राज्यात एक लोकसभा मतदारसंघ १८ लाखांचा आहे तर राजस्थानसारख्या राज्यात प्रति लोकसभा मतदार सरासरी ३३ लाख इतकी, म्हणजे जवळपास दुप्पट, आहे. सबब केरळमधील मतदार उत्तरेतील खासदाराच्या तुलनेत अधिक मूल्यवान. हा झाला एक भाग. तथापि लोकसंख्या हाच निकष असेल तर मतदारसंघ पुनर्रचनेनंतर लोकसभेत उत्तरेचे प्राबल्य राहणार हे उघड आहे. विद्यमान परिस्थिती किमान आणखी ३० वर्षे जैसे थे ठेवा अशी मागणी तमिळनाडूचे मुख्यमंत्री स्टालिन करतात त्यामागे हे कारण. अन्यथा उत्तरेतील चार-पाच राज्यांतून लोकसभेत निवडून पाठवल्या जाणाऱ्या खासदारांची संख्या निम्म्यापेक्षा अधिक होईल आणि ती राज्ये काबीज करणाऱ्यांहाती देशाची सूत्रे राहतील. याचाच दुसरा अर्थ दक्षिणेतील राज्यांस डावलून देश हाकणे सहज शक्य होईल. ही भीती काल्पनिक वा अनाठायी म्हणता येणार नाही. विशेषतः सध्याचे सत्ताधारी ज्या पद्धतीने हिंदी भाषा वा संस्कृतीचा आग्रह रेटत आहेत ते पाहिल्यास दक्षिणेतील द्रविडी राज्यांची चिंता रास्तच ठरते. गेली काही वर्षे भाजप दक्षिणेचे दरवाजे सातत्याने ठोठावत आहे. कर्नाटक या एकाच राज्यात त्यास यश मिळाले. आंध्र आणि तेलंगणा या राज्यांत भाजपने 'शिवसेना' मार्ग पत्करल्याचे दिसते. म्हणजे स्वतःचे स्थान निर्माण होईपर्यंत स्थानिक भाषिक पक्ष जोडीदार म्हणून घ्यावा आणि एकदा का स्वतःचा जम बसला की त्यास दूर करावे. सद्यःस्थितीत तेलुगु देसमचे चंद्राबाबू नायडू हे भाजपची गरज भागवतात. याखेरीज तमिळनाडू आणि केरळ या महत्त्वाच्या राज्यांत भाजपस हवा तितका शिरकाव करता आलेला नाही. भाजपकडून 'गंगा-कावेरी संगम' वगैरे उपक्रम सुरू आहेत ते याचसाठी. एकदा का उत्तरेतील हिंदी भाषकांच्या लोंढ्यांची गंगा दक्षिणेत कावेरीपल्याड स्थिरावली की या संगमाची गरज लागणार नाही. तेव्हा स्टालिन यांची सध्याची या मुद्द्यावरची आगपाखड कितीही राजकीय म्हणून हिणवली तरी त्या राजकारणास वास्तवतेची किनार आहे, हे निश्चित. तेव्हा घटनात्मकताही पूर्ण करायची असेल आणि दक्षिणेतील राज्येही बरोबर घ्यायची असतील तर केंद्रास काहीएक मध्यममार्ग काढावा लागणार. उदाहरणार्थ दक्षिणेतील राज्यांस राज्यसभेत अधिक प्रतिनिधित्व देणे किंवा मतदारसंघ पुनर्रचनेत लोकसंख्या या घटकाचे महत्त्व (वेटेज) काही प्रमाणात कमी करणे. हे कसे करायचे हे संबंधित तज्ज्ञ सांगू शकतात. पण त्यासाठी तज्ज्ञांचे ऐकण्याची वृत्ती हवी आणि नियतही साफ हवी. खरी बोंब आहे ती याचीच. मतदारसंघ पुनर्रचना अद्याप सुरूही झालेली नाही, त्याआधी करावयाच्या जनगणनेचाही पत्ता नाही आणि तरीही आपले गृहमंत्री अमित शहा 'तमिळनाडूची खासदार संख्या कमी होणार नाही' असे जाहीर आश्वासन देत असतील तर अन्य अनेक केंद्रीय नियामक यंत्रणांप्रमाणे हा 'मतदारसंघ पुनर्रचना आयोग'ही किती ताठ कण्याचा असेल हा प्रश्न. आणि दुसरे असे की त्यांचे आश्वासन खरे ठरून तमिळनाडूची खासदार संख्या कमी न होता आहे तितकीच राहीलही; पण त्याच वेळी उत्तरेतील राज्यांची खासदार संख्या वाढणार नाही, याची हमी काय? ती तशी वाढली तर दक्षिणेतील खासदार संख्या कमी न करताही सहजपणे 'लहान' ठरवता येईल. दक्षिणेचा खरा आक्षेप आहे तो उत्तरेच्या तुलनेत या 'लहान' ठरण्यालाच. या देशाचा इतिहास उत्तरकेंद्री आहे; हे नाकारता येणे अशक्य. त्यास आर्य विरुद्ध स्थानिक द्रविड अशी किनार आहे ती वेगळीच. त्यास तूर्त स्पर्श करण्याची गरज नाही. पण उत्तर विरुद्ध दक्षिण या भावनेचे अस्तित्व नाकारण्यातही अर्थ नाही. हे वास्तव प्रामाणिकपणे मान्य केले तरच आवश्यक त्या सुधारणा करता येतील. त्याची गरज आहे कारण आधीच विकासाच्या मुद्द्यावर पूर्व आणि पश्चिम अशी उभी दरी आहेच. त्यात आता उत्तर आणि दक्षिण अशी आधीपासूनच अस्तित्वात असलेली आडवी दरी वाढणार हे नक्की. तसे होणे सर्वार्थाने नुकसानकारक असेल.

!!! जागो, ग्राहक अब तो जागो !!!

(विश्व ग्राहक हक्क दिवस सप्ताह)



जो जन्माला आला तो झाला ग्राहकच! गुंतवणूकदार हासुद्धा ग्राहक आहे. त्याचा हक्कासाठी न्यायालयीन आव्हानात्मक लढा सुरू आहे. ग्राहकांना हक्काची जाणीव व्हावी आणि तो बाजारात खरेदीच्या हक्काबाबत सक्षम व्हावा, याकरिता विविध ग्राहक संघटना लोकांना जागरूक करीत आहेत. या सर्वांसाठी १५ मार्च हा दिवस खुप महत्त्वाचा आहे. हा दिवस जागतिक ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येतो. आपल्या अधिकारांविषयी ग्राहकांना जागृती प्रदान करणारा श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजींचा हा लेख... संपादक.

दिनांक १५ मार्च हा दिवस संपूर्ण जगात जागतिक ग्राहक हक्क दिन म्हणून साजरा होत असतो. ग्राहकांना सेवा पुरवताना होणाऱ्या हलगर्जीपणामुळे सन १९६० साली अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीमध्ये ग्राहकांच्या प्रश्नांचा निचरा करण्यास एक व्यासपीठ तयार करण्यात आले. त्यासाठी जागतिक स्तरांवर पाठपुरावेही करण्यात आले. त्याला युनेस्कोनेही मान्यता दिली. त्यानुसारच दरवर्षी १५ मार्चला हा दिवस विश्वभरात साजरा केला जातो. ग्राहकाला अर्थव्यवस्थेचा राजा असे संबोधले जात असले, तरी त्याला मात्र बाजारपेठेत सतत अडवले, नाडवले अन् फसवलेही जातच असते. बिच्चाऱ्याची अपेक्षा तरी काय असते हो? आपण खरेदी करत असलेली वस्तू योग्य दर्जाची, योग्य गुणवत्तेची व वाजवी किमतीची असावी, एवढीच त्याची किमान अपेक्षा असते. पण त्याच्या नशिबी मात्र सतत अपेक्षाभंग आणि मनस्तापच!



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

ग्राहकांचे होणारे शोषण थांबवून त्याच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी दि. २६ डिसेंबर १९८६ या दिवसापासून भारत सरकारने 'ग्राहक संरक्षण कायदा' अंमलात आणला. परंतु केवळ कायदा करून त्यामागील उद्दिष्ट साध्य होत नसते. हा कायदाही त्याला अपवाद नाही. कायदा अस्तित्वात येऊन ३६ वर्षे झालीत, पण थांबले का ग्राहकांचे शोषण? थांबली का त्यांची फसवणूक? कायद्याचा धाक, दरारा निर्माण व्हायला हवा असेल, तर तो ज्या घटकांसाठी केलेला आहे, तो घटक- ग्राहक आधी जागृत असायला हवा. कायद्याचे शस्त्र त्याला पेलता यायला हवे. अन्यथा निरक्षरांपुढे शेकडो उत्तमोत्तम ग्रंथ ठेवण्यासारखाच तो प्रकार होईल.

बाजारपेठेत दूध किंवा शीतपेय एमआरपीपेक्षा अधिक किमतीने घ्यावे लागते. भाजीवाला तराजूत वजनाऐवजी दगड ठेवतो. दुधात भेसळ होते. टॅक्सीवाल्यांची लुबाडणूक आपण निमूट सहन करतो. बिल्डर, फायनान्स कंपन्या, प्रवासी कंपन्या, वस्तूंचे उत्पादक आपल्याला फसवताहेत, हे सगळे का? कारण एकच, अजूनही आपल्यातील शोषणाविरुद्ध लढणारा खरा ग्राहक बाहेर येत नाही. ग्राहकांच्या हितसंबंधाचे अनुचित प्रथांपासून संरक्षण करणे हे आज ग्राहक चळवळीपुढील मोठे आव्हान आहे. त्यासाठी करावी लागणारी ग्राहक जागृती, वेळेप्रसंगी द्यावे लागणारे न्यायालयीन लढे हे सगळेच आव्हानात्मक आहे. कधी कधी तर ही लढाई असते एकट्याची. त्यासाठी वेळप्रसंगी ग्राहक संघटनांचीही मदत घ्यावी लागते, तर कधी ग्राहक संघटना व्यापक ग्राहकहीत लक्षात घेऊन प्रातिनिधिक लढे लढतात. परंतु त्यासाठी समाजातील प्रत्येक ग्राहकाचे सक्षमीकरण होणे काळाची गरज आहे. त्याकरिता गरज आहे ती फक्त इच्छाशक्ती आणि चिकाटीची.

भारतासारख्या विकसनशील देशात खऱ्या अर्थाने ग्राहक संरक्षण व्हायचे असेल तर ग्राहक प्रशिक्षण, ग्राहक प्रबोधन व ग्राहक जागृती होणे अत्यावश्यक आहे. अनेकविध समस्यांच्या चक्रव्यूहात सापडलेल्या ग्राहकांचे प्रश्न अनंत आहेत. कामे ठेकेदाराला सुपूर्द करून प्रश्न सुटत नसतात. संप, बंद, मोर्चे, निदर्शने, रास्ता रोको यासारख्या आंदोलनानेही प्रश्नांची स्थायी स्वरूपाची उत्तरे मिळत नाहीत. ग्राहक संरक्षण कायद्याच्या आधारे काही प्रश्न सोडविता येतीलही, पण त्यालाही मर्यादा आहेतच. म्हणून आपले प्रश्न सोडविण्यास स्वतःच पुढाकार घ्यावा लागतो. स्वतःच स्वतःची शक्ती निर्माण करावी लागते अन् वाढवावीही लागते. त्याचसाठी हवे असते प्रशिक्षण, प्रबोधन व जागृती. शोषणमुक्तीचा तोच मूलाधार! ग्राहक चेतनेतून अपप्रवृत्तींवर अंकुश ठेवता येईल आणि हेच कार्य ग्राहक पंचायत ही स्वायत्त संस्था करीत आहे. ग्राहक एवं राजा मानणारी ग्राहक पंचायत ही विचाराधिष्ठित संघटना आहे. आज अर्थव्यवस्थेचे स्वरूप वेगाने बदलत आहे. सेल, एकावर एक फ्री, लॉटरी, कन्सेशन, बक्षीस, आदींच्या रूपाने नको त्या वस्तूंची अडगळ घरात वाढत आहे. भेसळयुक्त दूध, अन्न आणि औषधेसुद्धा पोटात जावून व्यक्तीसह समाजस्वास्थ्य बिघडत आहे. म्हणूनच असे वाटते की, ग्राहकराजा गुलाम होऊन आज बाजारात उभा आहे. हे चित्र बदलून त्याला खऱ्या अर्थाने राज्याभिषेक करायचे व्रत स्वीकारले. शोषणमुक्तीसाठी पुढाकार घेऊन ग्राहक संरक्षण कायदा करण्यास शासनाला भाग पाडले. या कायद्याने त्रिसदस्यीय न्यायासन अभिप्रेत आहे. त्यापैकी एक सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश हे न्यायासनाचे अध्यक्ष व उर्वरित दोन व्यक्तींपैकी एक स्त्री, अर्थ, कायदा, प्रशासन, व्यापार या क्षेत्रातील तज्ज्ञ असाव्यात, अशी तरतूद आहे.

या १५ मार्च आंतरराष्ट्रीय ग्राहक दिनाचे वेगळेच महत्त्व आहे. १५ मार्च १९६२ साली अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष जॉन केनेडी यांनी अमेरिकन संसदेपुढे केलेल्या भाषणात तेथील ग्राहकांना त्यांचे- सुरक्षितता, माहिती, निवड आणि प्रतिनिधित्व हे चार हक्क प्रदान केले. त्यानंतरच्या कालावधीत ग्राहक संस्थांच्या जागतिक संघटनेने संयुक्त राष्ट्रसंघाशी चर्चा करून त्यांचा पाठपुरावा केला. त्यांत मूलभूत गरजा पुरविण्याचा हक्क, तक्रार निवारण्याचा हक्क, ग्राहक शिक्षणाचा हक्क आणि स्वच्छ पर्यावरणाचा हक्क, या आणखी चार ग्राहक हक्कांना आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली. अशाप्रकारे हे आठ ग्राहक हक्क आज जगभर मान्य झाले आहेत.

ग्राहकांना गृहीत धरू नका, तो आहे म्हणून तुमचा व्यवसाय आहे. सेवा पुरवठादार कंपन्यांकडे वापरणाऱ्या ग्राहकांची विविध माहिती प्रचंड प्रमाणात जमा होते. ग्राहकांची खाजगी माहिती उघड करू नये. त्याचे बंधन कंपन्यांवर असावे. अवैध व्यावसायिकांवर कारवाई करावी. ग्राहक संरक्षण सुधारणा कायदा २०१९मध्ये आला. त्यात ग्राहक हक्काच्या अनेक तरतुदी आहेत. जाहिरातीत खोटे दावे करणाऱ्यांवर कठोर कारवाईचे एफडीएला अधिकार आहेत. जाहिरातीतील दावे प्रमाणित करण्याची कंपन्यांना आवश्यकता आहे. नमूद केलेली सेवा कंपन्यांना द्यावीच लागेल. गोडाऊनमध्ये होणाऱ्या अवैध व्यवसायावर कारवाई करण्याची गरज आहे. नवीन सुधारित कायद्याची अंमलबजावणी व्हावी. केंद्राने २०१९मध्ये ग्राहक संरक्षण कायद्यात सुधारणा केली. पण त्याचे नियम तयार नाहीत. तातडीने अंमलबजावणी व्हावी. जिल्हाधिकाऱ्यांच्या ग्राहक संरक्षण परिषदेवर नियुक्तीत राजकीय हस्तक्षेप नको. ग्राहकांना हक्काची जाणीव होऊन लोकशाही दिनाच्या तक्रारी वाढाव्यात. ग्राहकांच्या हक्कासाठी केंद्रात ग्राहक संरक्षण आणि अन्न पुरवठा मंत्रालय वेगवेगळे करावयास हवे. शासनाने प्रत्येक जिल्ह्यात ग्राहक संरक्षण कार्यालय उघडावे. राज्यात स्वतंत्र ग्राहक संरक्षण मंत्रालय स्थापन करावे. प्रत्येक जिल्ह्यात कार्यालय उघडून आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांची त्यात नेमणूक करावी आणि ग्राहक संरक्षण परिषदेच्या बैठकीची जबाबदारी त्यांच्याकडे द्यावी. त्यामुळे ग्राहकांशी संबंधित तक्रारींना तातडीने न्याय मिळेल. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचातफे ग्राहकांना नियमाप्रमाणे ९० दिवसांपर्यंतही न्याय मिळत नाही. निकाल लागला तरी मात्र अंमलबजावणी काही होत नाही, हा एक जटील प्रश्न आहे!

आपण ग्राहक म्हणून वावरताना खुपदा प्राप्त अधिकारांची आणि हक्कांची पायमल्ली होते. अशावेळी ठामपणे, चिकाटीने अधिकारांची अंमलबजावणी करून घेण्याची गरज आहे. डिजिटल व्यवहार करणाऱ्या ग्राहकांची संख्या वेगाने वाढत आहे. मात्र या डिजिटल सेवा नीट समजून घेण्याची, त्यांचा वापर योग्यप्रकारे करण्याची आणि सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना हे दाखवून देण्याची खरी हीच वेळ आहे!

!! विश्व ग्राहक हक्कदिन सप्ताहनिमित्त समस्त बंधुभगिनींना सचेतनात्मक हार्दिक शुभेच्छा !!

सुचारित्व...

जरी भांडणे घरामध्ये
लपवून ठेवावे शत्रुत्व
जाहीर मिठ्यामारून
सिध्दकरायचे मित्रत्व

पेडबातम्या पसराव्या
जगजाहीर सहिष्णुत्व
कॅमेरा सारखा सोबत
प्रदर्शन करे सुचारित्व

बालिशबोलणेविनोदी
दावते बुध्दीचे शिशुत्व
हसतमुख स्वभाव हा
भाट गातील ते गुणत्व

प्रलयजरी आला कुठे
कळत नसे अगाधित्व
वलये असावी भोवती
झाकून जाईअकृतित्व

चष्मेघालावे आकर्षक
दिसू नये जगा अंधत्व
कितीझाकावे अवगुण
नसा नसा भरे दभित्व

लपवूनठेवावा खंजीर
पेहरावा दिसो साधुत्व
व्याख्याने झोडा असे
वाणीत अत्यंत मधुत्व

लायकी नसे मुळीजरी
हवेचं सत्तेचे स्वामित्व
येन केन प्रकारेण भले
कायमसत्तेचे अस्तित्व

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

वगतृत्व..

जरी भांडणे
घरामध्ये
लपवून ठेवावे शत्रुत्व
जाहीर मिठ्यामारून
सिध्दकरायचे मित्रत्व

खुमखुमी ती युध्दाची
समशेरीत नसे जेतृत्व
सपाटून हारे कैकवेळे
आम्ही करणारं नेतृत्व

म्हातारपणा सोसवेना
कमी ना तरी लोलुत्व
पायात कंपने थरथरी
तरीही दाखवा प्रभुत्व

सभेत हवा मान प्रथम
बरळत राहते वक्तृत्व
नाटकीपणा रंध्रा रंध्रा
कमी ना होई वगतृत्व

भित्रेपणा कृती उक्तीत
उसळी मारते रे पुंस्त्व
पेलवेन झुळूक जराशी
गाजवू लागी पुरूषत्व

घेतला संन्यास बुध्दीने
केव्हाचं पावले पंचत्व
साधु बनूनि व्याख्यानी
सांगत राहतो पंच तत्व

कळेना बाळबोधभाषा
तत्वज्ञान सांगे निस्सत्व
बरळत रहावे निष्फळ
का निःसंदिग्ध निःसत्व

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

या भावनांना मी एकटीच जबाबदार कशी?

प्रिय सर,

कसे आहात? मजेत असाल ही आशा... खरंतर तुम्हाला भेटून किंवा फोन करूनसुद्धा मला तुमच्याशी बोलता आले असते, पण तुम्हाला सध्यातरी काही दिवस भेटायचे नाही हा माझा निर्णय होता आणि आहेसुद्धा... आणि माझा निर्णय तुम्हाला मान्यदेखील आहे. पण काही दिवस म्हणजे नेमके किती दिवस? या प्रश्नाचे उत्तर नाही सर माझ्याकडे... असा निर्णय मी का घेतला? याचे स्पष्टीकरण देण्याची मला गरज वाटत नाही. पण तुमच्यासोबत बोलल्याशिवाय माझ्या दिवसाची सुरुवात तुमच्याशी ओळख झाल्यापासून कधी झालीच नाही... त्यामुळे तुमच्याशी बोलल्याशिवाय नाही करमत मला. हे तुम्हालाही खूप चांगले माहिती आहे... पण पुढचे काही अनर्थ टाळण्यासाठी मनावर खूप मोठा दगड ठेवून मला तुमच्याशी बोलणे बंद करावे लागले... मनाला आवर घालणे फारच कठीण गोष्ट... बोलणे बंद केले तरी मन तुमच्याच आठवणीभोवती घिरट्या घालत आहे, तुमच्याशी खूप बोलावेसे वाटत आहे, पण मागचेच दिवस पुन्हा समोर नको म्हणून मी मनाला आवर घालत आहे. ही गोष्ट माझ्यासाठी खूप कठीण आहे सर... तुम्ही समजूही नाही शकाल एवढी कठीण आहे. तुम्ही नेहमी म्हणत होते की, मला सर्व शक्य आहे. कदाचित असेलही तसे... म्हणून मी तसा प्रयत्न तरी करत आहे.

मी आयुष्यभर तुमच्यासोबत असली पाहिजे, सर्वात आधी हे स्वप्न तुम्ही बघितले सर... मी तर या सर्व गोष्टीपासून अनभिज्ञ होते. कारण तुम्ही केलेल्या विचाराप्रमाणे मी कधी विचारच केला नव्हता. तुम्ही फक्त स्वप्नच बघितले नाही तर बघितलेल्या स्वप्नाला प्रत्यक्षात उतरविण्यासाठी पहिले पाऊलदेखिल टाकले. पण नियतीच्या मनात वेगळीच खेळी सुरू होती. तुमचे पाऊल योग्य दिशेने पडलेच नाही. त्यामुळे तुमच्याकडून खूप मोठी चूक झाली, हे ओझे मनात घेऊन तुम्ही वावरत होता, हे जेव्हा मला समजले तेव्हा मी तुमच्याशी स्वतःहून बोललीदेखील... तेव्हा तुम्ही मला म्हणाले देखील की, माझ्या मनावरील भार हलका झाला म्हणून... बस, मला तेवढे बोलून हा विषय कायमचा संपवायचा होता. तुमच्याशी मला पुढे बोलायचेदेखील नव्हते सर... पण नियती इथे देखील खेळी खेळलीच... माझ्या मनात तुमच्याबद्दल साधा मैत्रीही करण्याचा भाव नव्हता सर... कारण पुढे मला तुमच्याशी बोलले पाहिजे असे कधी वाटलेच नाही तेव्हा... पण काही कारणांमुळे का होईना आपण बोलायला लागलो. माझ्याबद्दल तुम्हाला बरीचशी माहिती होती, माझ्या व्यक्तिमत्वातील अनेक पैलूंची तुम्हाला जाणीव होती. पण मी तर तुमच्याबद्दल, तुमच्याशी संबंधित सर्व गोष्टींबद्दल अनभिज्ञ होती सर... आपण बोलत गेलो, एकमेकांचे विचार समजले. वैचारिक पातळी समजली... आणि एक गोष्ट आपल्या दोघांच्याही लक्षात आली की, आपला स्वभाव, आवडीनिवडी, दुस-यासाठी धावपळ करण्याची वृत्ती, जीवनातील पुढचे ध्येय, एवढेच काय तर शॉपिंगमध्ये सर्वात जास्त आवडणा-या वस्तूही सारख्याच होत्या. तुम्ही म्हणालेदेखील होते की आपण मागच्या जन्मात कुंभच्या मेळ्यात हरविलेले बहीणभाऊ असेल, पण एक सांगू सर... बहीणभाऊदेखील इतके स्वभावाच्या बाबतीत सारखे नसतात जितके आपण आहेत. त्यामुळे असेल कदाचित आपण खूप बोलत गेलो, इतके बोलत गेलो की, तुम्हाला प्रत्यक्षात एकदाही न भेटता मी नुसत्या बोलण्यानेच तुमच्या प्रेमात पडली. ही गोष्ट माझ्यासाठी खूप मोठी होती सर... कारण नुसत्या अप्रत्यक्ष बोलण्यातून कुणी कुणाच्या प्रेमात पडू शकते, या गोष्टीवर माझा कधी विश्वासच नव्हता... हे तुम्हाला देखील चांगले माहिती आहे. पण माझा हा विश्वास साफ खोटा ठरला सर...

माझा स्वभाव मुळातच स्पष्टवक्ता... मी माझ्या मनातील सर्व भावना बोलून दाखविल्या तुम्हाला... तुम्ही तुमचेही स्पष्टीकरण दिले ते मला पटलेदेखील... पण मला एक विचारायचे आहे सर, माझ्या मनात या भावना निर्माण होण्यासाठी मी एकटीच जबाबदार आहे?

तुम्ही खूप साधेपणाने मला सांगून गेले की, हे विसरून जा... पण एवढं सोप्पं असतं का हो सर, क्षणात सर्व विसरणे... तेही माझ्यासारख्या मुलीला... तुम्ही तुमचे सर्व स्पष्टीकरण दिले मला... पण खरं सांगू मला तुमच्याकडून कुठल्याही स्पष्टीकरणाची गरज नाही... कारण माझा खूप विश्वास आहे तुमच्यावर... तुम्ही नियती समजून सर्वमान्य केले आणि परिस्थिती जशी आहे तशी सहज स्वीकारली. पण माहिती आहे सर... हरण्यासाठीसुद्धा नवा डाव मांडावा लागतो... पण मला खंत आहे तुम्ही मला डाव मांडायची संधीच नाही दिली...

मी खूप आनंदात जीवन जगत होती. माझे मार्ग अगदी स्पष्ट होते. तुम्ही एखाद्या स्वप्नाप्रमाणे माझ्या आयुष्यात आलात... कमी काळात का होईना खूप आठवणी दिल्यात... अगदी प्रत्येक शब्दाशब्दात तुमच्या आठवणी आहेत... ज्या विसरता येणे कधीही शक्य नाही... तुम्ही माझ्या आयुष्यात नसाल याच भावनेने खूप बेचैन होते मी. तुम्ही मला म्हणायचे की, मी जादूगार आहे; पण खरे जादूगार तुम्ही आहात सर...


माहिती आहे सर, नाकारण्यासाठी हजार कारणे असली तरी होकार देण्यासाठी एक कारण पुरेसे असते; पण माझ्याबद्दल मला एवढे ओळखूनही एक कारण नाही पटवून देऊ शकले तुम्ही घरी... ही माझ्यासाठी सर्वात दुर्दैवी बाब आहे...

आयुष्याच्या पुढच्या टप्प्यावर आपल्या दोघांनाही अतिशय महत्त्वाचा निर्णय घ्यायचा आहे... आपल्या दोघांचेही मार्ग वेगळे आहेत... तुमच्या मताप्रमाणे ही नियतीची खेळी आहे... तर असेल कदाचित तसे...

आता नाही तर आयुष्याच्या एखाद्या वळणावर भेट होईलच... माझ्या शुभेच्छा नेहमी तुमच्यासोबत असतील... खूप मोठे व्हा आणि खूप नाव कमवा...

तुमचीच
अनामिका, अमरावती

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाचे पाऊल



वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी पुणे महानगरपालिका आणि वाहतूक पोलिसांनी शालेय वाहतूक धोरणांतर्गत विशेष प्रकल्प सुरू केला असून, त्या अंतर्गत शाळा परिसरात रस्त्यांवर चिन्हांकित आकृती काढण्यात येत आहे. त्यामुळे वाहनचालक या भागात आले, की त्यांना वाहन सावकाश चालविण्याची सूचना ठळकपणे मिळेल.

महानगरपालिका आणि वाहतूक पोलिसांनी एकत्रितपणे लक्ष्मी रस्ता आणि हुजूरपागा शाळेजवळ पिवळ्या आणि पांढऱ्या रंगाच्या पट्ट्यांची नक्षी काढली आहे. वाहनचालकांकडूनदेखील या प्रकल्पाला चांगला प्रतिसाद मिळत असून, शाळा सुटल्यानंतर विद्यार्थ्यांना बिनदिक्कत रस्ता ओलांडता येणे शक्य होत आहे.

पुणे शहरातील मध्यवर्ती भागातील शाळा या महत्त्वाच्या रस्त्यांवर आहेत. लक्ष्मी रस्ता, टिळक रस्ता, कुमठेकर चौक, केळकर रस्त्यावर प्राथमिक, माध्यमिक शाळा असून, या रस्त्यांवर वाहनांची वर्दळ कायम असते. अनेक विद्यार्थी पायी किंवा सायकलवर शाळेत जातात. शालेय विद्यार्थ्यांना शाळेत जाताना किंवा शाळा सुटल्यानंतर अनेकदा वाहतूककोंडीचा सामना करावा लागतो. अपघाताचीही शक्यता असते. या पार्श्वभूमीवर महापालिका आणि वाहतूक पोलिसांनी एकत्रित येऊन प्रमुख शाळांबाहेरील रस्त्यांवर ठरावीक दोन रंगांची नक्षी काढून वाहनचालकांना पूर्वसूचना देण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

असा होणार फायदा

शाळेबाहेरील रस्त्यांवर ३० फुटांपर्यंत पांढऱ्या, पिवळ्या रंगाच्या नक्षीमुळे वाहनचालकांना शाळा असल्याचे लक्षात येईल. शाळा सुटण्यापूर्वीच नाही, तर इतरवेळी देखील शाळेचा परिसर असल्याचे स्पष्ट होऊन वाहनचालकांना वेग कमी करण्याचे संकेत मिळतील. वेग नियंत्रित झाल्याने अपघात किंवा अडचण न राहता सुरक्षितता निश्चित करता येणार आहे.

शहरातील शालेय विद्यार्थ्यांची सुरक्षितता निश्चित करणे ही पुणे महानगरपालिकेची प्राथमिकता आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या वतीने वाहतूक पोलिसांच्या सहकार्याने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी प्रमुख रस्त्यांवर उपक्रम राबविला जाणार आहे. शहरातील वर्दळीची सात ते आठ ठिकाणे यासाठी निश्चित करण्यात आली आहेत.

अनिरुद्ध पावसकर, पथ विभागप्रमुख, पुणे महानगरपालिका

लाडक्या बहीण योजनेमध्ये झालेली फसवणुकीच्या बाबत तहसीलदार कार्यालय, उरण येथे शिवसेनेची धडक

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे



उरणः गुरुवार दिनांक १३ मार्च २०२५ रोजी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे आदेशाने व जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना उरण तर्फे तहसीलदार उद्धव कदम यांना भाजपा, शिंदे, अजित पवार यांच्या महायुती सरकार विरोधात निवेदन देण्यात आले. २०२४ च्या निवडणूकीत लाडकी बहीण योजनेच्या १५०० ऐवजी २१०० रुपये देण्याच्या आश्वासनाची पूर्तता करत नसल्याने जुमलेबाज महायुती सरकारचा निषेध करण्यात आला. खोटी आश्वासने देऊन महिलांची फसवणूक करणाऱ्या सरकारच्या विरोधात आक्रमकपणे आंदोलन करण्याचा इशारा उपस्थितांनी दिला.

यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा माजी आमदार मनोहरशेठ भोईर, उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर, तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, तालुका संघटक बी एन डाकी, माजी नगराध्यक्ष गणेश शिंदे, तालुका संपर्कप्रमुख दिपक भोईर, शहर प्रमुख विनोद म्हात्रे, तालुका उपसंघटक रूपेश पाटील, माजी शहरप्रमुख महेंद्र पाटील, माजी उपनगराध्यक्ष परमानंद करंगुटकर, माजी उपसभापती हिराजी घरत, उपजिल्हा संघटीका ममता पाटील, उरण शहर संघटिका सुजाता गायकवाड, जिल्हानिहाय वक्ता मनीषा ठाकूर, महिला विधानसभा संघटिका ज्योती म्हात्रे, वशेणी सरपंच अनामिका म्हात्रे, कविता पाटील, शाखा संघटिका लता राठोड सोशल मिडिया समन्वयक नितिन ठाकूर, विभागप्रमुख नारायण तांडेल, राजन कडू, वैभव करंगुटकर, माजी शाखाप्रमुख पागोटे रमेश पाटील, हितेंद्र म्हात्रे, डोंगरी शाखाप्रमुख सचिन पाटील आदींसह महिला पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परभणीच्या पूर्णा येथील श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालयात महिला दिन साजरा



परभणी ■ अरविंद कांबळे

परभणी : पूर्णा ,८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणुन साजरा करण्यात येतो या निमित्ताने श्री गुरु बुद्धिस्वामी महाविद्यालय येथे महिला दिनानिमित्त महाविद्यालयातील सर्व महिला प्राध्यापिकांचा व महिला कर्मचारी यांचा सत्कार संस्थेचे सचिव मा.श्री अमृतराज कदम, सहसचिव श्री गोविंदराव कदम यांच्या हस्ते सर्व महिलांना पुष्पगुच्छ देऊन महिलादिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्यायावेळी बोलताना ते म्हणाले की वर्तमान काळात महिलांनी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करीत असून भविष्यात महिलांच्या कार्याची व्याप्ती वाढणारी आहे. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के राजकुमार, उपप्राचार्य डॉ. शिवसांब कापसे, डॉ. गजानन कुरुंदकर , डॉ. जे एस. पुल्ले डॉ.जी. पी. कापुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

छावा चित्रपट पाहून जिल्हा परिषदेची मुले भारावली



पुणे ■ प्रतिनिधी

पुणे : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी (ता. हवेली) येथील विद्यार्थ्यांना शनिवारी 'छावा' चित्रपट दाखविण्यात आला. हा चित्रपट पाहून विद्यार्थी अक्षरशः भारावले. चित्रपट संपल्यानंतर या विद्यार्थ्यांनी चित्रपटगृहात 'हर हर महादेव', 'छत्रपती संभाजी महाराज की जय', 'जय भवानी' आदी घोषणाही दिल्या. विद्यार्थ्यांनी दिलेल्या या घोषणांना चित्रपट गृहातील उपस्थितांनीही प्रतिसाद दिला.

नवज्योत मित्र मंडळ यरवडा व युगंधर मित्र मंडळ सनसिटी रस्ता या दोन मंडळांनी या विद्यार्थ्यांना सिंहगड रस्त्यावरील फन टाईम चित्रपटगृहात चित्रपट दाखविला. तसेच चित्रपटाच्या प्रारंभी आणि चित्रपट संपल्यानंतर या मंडळांकडून विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या खाऊचे वाटप करण्यात आले. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना छावा चित्रपट दाखविण्यासाठी बुधवार पेठेतील साईनाथ मित्र मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष पियुष शहा यांनी पुढाकार घेतला होता. चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून हा चित्रपट पाहण्याची विद्यार्थ्यांनी इच्छा व्यक्त केली होती. त्यामुळे चित्रपटाविषयी विद्यार्थ्यांच्या मनात प्रचंड उत्सुकता होती. चित्रपट संपल्यानंतर चांगला चित्रपट पाहिल्याचा आनंद या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता.

या उपक्रमासाठी केंद्र प्रमुख मोहन भालचिम, केंद्र समन्वयक किशोर भवाळकर यांनी सहकार्य केले. यावेळी विद्यार्थ्यांसह शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापक मनिषा बुंदे, नवज्योत मित्र मंडळाचे अध्यक्ष अमित जाधव, युगंधर मित्र मंडळाचे अध्यक्ष मयुर पोटे, फन टाईम चित्रपटगृहाचे व्यवस्थापक संदिप कांबळे, श्वेता जाधव, समर्थ जाधव, रवींद्र पायगुडे, सुवर्णा पायगुडे, दिपाली पारगे, अलका पारगे आदी उपस्थित होते.

गोवठणे शाळेची शैक्षणिक सहल आनंदात साजरी

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे



उरणः माझा गाव माझा अभिमान आणि माझी शाळा या संकल्पनेतून गेली अनेक वर्ष शाळा आणि शालेय विद्यार्थी यांच्यासाठी शैक्षणिक साहित्य, शाळा गणवेश, पिटी ड्रेस, खाऊवाटप, शैक्षणिक चित्र रंगरंगोटी असे नवनविन उपक्रम राबविणाऱ्या गोवठणे विकास मंच आणि वंदे मातरम् सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने रा.जि.प. प्राथमिक शाळा गोवठणे शाळेच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल शिवसमर्थ स्मारक आणि रामबाग येथे आयोजित केली होती.

शाळेतून सहल निघताना वंदे मातरम् सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सूरज म्हात्रे यांच्या सौभाग्यवती तथा उरण तालुका भाजपच्या महिला अध्यक्षा ?ड.राणीताई सूरज म्हात्रे यांनी मुलांना सहलीसाठी शुभेच्छा दिल्या.तर गोवठणे विकास मंच अध्यक्ष सुनिल वर्तक, उपाध्यक्ष अनंत वर्तक, कार्याध्यक्ष संतोष म्हात्रे, सचिव प्रेम म्हात्रे, खजिनदार संदीप पाटील आणि सहसचिव प्रदीप वर्तक तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना म्हात्रे आणि सहशिक्षक अजित जोशी हे स्वतः सहल निघण्यापासून ते विद्यार्थी घरी येईपर्यंत विद्यार्थ्यांची काळजी घेण्यास सहली समवेत होते.

शिव समर्थ स्मारकात गेल्यानंतर तेथील गाईड प्रशांत म्हात्रे यांनी सर्व विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती अनेक सरदार,शस्त्रे त्याच बरोबर स्मारकात असलेल्या विविध नेत्यांच्या आणि समाजसुधारकांच्या पुतळ्यांची ओळख आणि त्यांचे कार्य विषद केले.स्मारकातील मिनी थिएटर मध्ये बसून तानाजी चित्रपटातील एक गीत आणि छत्रपतींचे अनेक युद्ध प्रसंग पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वहात होता.विद्यार्थी आणि आयोजकांतर्फे गाईड चे आभार मानून शीतपेय घेतल्यानंतर सहलिचे प्रस्थान रामबाग येथे झाले.

रामबाग मध्ये गेल्यागेल्या मुलांनी मांसाहारी भोजनाचा आस्वाद घेतल्यानंतर ताबडतोब रंगीबिरंगी विद्युत रोषणाई असलेल्या रामबागेतील उसळताना प्रकाशमान होणारे रंगीबिरंगी कारंजे, पाळणे, घसरगुंडी सारख्या सर्व प्रकारच्या खेळण्यामधून मनसोक्त आनंद घेतला.विद्युत रोषणाईमुळे चमकणारी झाडे पाने फुले या सर्वांनी मुळे इतकी खुश होती की, अगदी घरी यावयास तयार नव्हती. शेवटी रात्री बाग बंद होण्याच्या वेळेस. मुलांनी घरी येण्यास काढता पाय घेतला.गोवठणे विकास मंचचे अध्यक्ष सुनिल वर्तक यांनी सहलीस मंजुरी देणाऱ्या शालेय शिक्षक तथा शाळा व्यवस्थापन समिती चे आभार मानून परतीच्या प्रवासानंतर सहलीचा समारोप केला. गाव आणि मित्र परिवार तथा अनेक सामाजिक संस्थांकडून प्रेम म्हात्रे यांनी सहलीचे केलेले यू ट्यूब प्रक्षेपण पाहून सहलीचा उपक्रम राबविणाऱ्या गोवठणे विकास मंच आणि वंदे मातरम् सामाजिक संस्था या दोन्ही मंडळांचे कौतुक करून धन्यवाद देत आहेत.

सेकंडरी एम्प्लॉईज सोसायटी मुंबईचे संचालक मंडळ यांनी गोव्याचे मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांची सदिच्छा भेट

सातारा कराड ■ राहुल पवार



सातारा कराडः गोव्याचे मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांची नुकतीच महाराष्ट्र राज्यातील सेकंडरी सोसायटी मुंबईचे संचालक मंडळ यांनी भेट घेतली दोन ते तीन दिवसाच्या अभ्यास दौऱ्यात गोव्यातील बँक व्यवस्था पतपेढी या संदर्भातील अभ्यास करण्यासाठी मुंबईचे संचालक मंडळ गोव्याच्या अभ्यास दौऱ्यावर होत यादरम्यान त्यांनी विविध संस्था पतपेढी यांना भेटी दिल्या शिक्षकांचे सामाजिक प्रश्न व त्यांच्या कुटुंबासाठी मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी संस्थेच्या वतीने विविध योजना याविषयी गोव्याच्या मुख्यमंत्र्यांना माहिती देण्यात आली या भेटीदरम्यान तेथील काही शाळांना सुद्धा संचालक मंडळांनी भेट देऊन तेथील शैक्षणिक उपक्रम व तेथील विद्यार्थ्यांच्या साठी विविध योजना याविषयी सुद्धा माहिती घेतली मुख्यमंत्र्यांच्या बरोबर त्यांनी केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांचीही सदिच्छा भेट घेतली यावेळी महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे उपाध्यक्ष सचिन नलवडे यांनी सांगितले की गोव्यासारख्या छोट्या राज्याकडून शैक्षणिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवले जातात त्यांचा विद्यार्थ्यांना कॉन्सलर हा उपक्रम खूप छान आहे सोशल मीडिया व इतर गोष्टींचा विद्यार्थ्यांच्या प्रभाव आहे शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबर इतरही सामाजिक ज्ञान विद्यार्थ्यांमध्ये दिले पाहिजे सामाजिक जाणीव सकारात्मक बदल निर्माण झाले पाहिजेत नवीन शैक्षणिक धोरणात अनेक उपक्रम आहेत विद्यार्थ्यांमध्ये प्रबोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांना विद्यार्थी मित्र योजना महाराष्ट्रातल्या ही शाळेत भविष्यात राबवल्या पाहिजे यासाठी शिक्षण अभ्यासक मंडळ व मुख्याध्यापक राज्य मंडळ प्रयत्नशील राहील असे त्यांनी सांगितले शिक्षक बँक सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील सचिव किशोर पाटील सहसचिव सतीश माने खजिनदार सत्ते श शिंदे संचालक व महाराष्ट्र मुख्याध्यापक महामंडळाचे उपाध्यक्ष सचिन नलावडे पांडुरंग कणसे जगनाथ जाधव प्रमोद देशमुख यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते.

तालुकास्तरीय महावाचन चळवळ स्पर्धेत भांबर्डे शाळा ठरली अव्वल

पुणे ■ विवेकानंद फंड



पुणे : आदरणीय शिक्षणाधिकारी श्री संजय नाईकडे जि.प. पुणे यांच्या संकल्पनेतुन साकार झालेली महावाचन चळवळ अंतर्गत तालुकास्तरावर पुस्तक समीक्षण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. महावाचन चळवळ आयोजित पं.स. शिरूर यांच्याकडून घेण्यात आलेल्या केंद्रपातळीवरील पुस्तक समीक्षण स्पर्धेत जि.प. प्रा. शाळा भांबर्डे शाळेचा विद्यार्थी रोहित रघुनाथ राठोड इ.५ वी (गट ३ री ते ५ वी) रांजणगाव गणपती केंद्रात प्रथम क्रमांक आला .तसेच शिरुर तालुक्यात द्वितीय क्रमांक आल्याबद्दल पंचायत समिती शिरुर तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी आदरणीय बाळकृष्ण कळमकर ,विस्तार अधिकारी किसन खोडदे ,पवार साहेब,चकोर साहेब तसेच रांजणगाव गणपती केंद्राचे केंद्रप्रमुख किसन शिंदे यांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानपत्र वितरीत करण्यात आले.

पुस्तक समीक्षण स्पर्धेत 'श्यामची आई' या पुस्तकावर आधारित माहिती सादर करण्यात आली.महावाचन चळवळीचा फायदा मुलांच्या अध्ययनात होतो.एकाग्रता व चिकित्सक वृत्ती वाढीस लागते. मुलांना वाचनाची आवड निर्माण होते असे मार्गदर्शक शिक्षक अनिस सय्यद यांनी सांगितले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्याचे अभिनंदन मुख्याध्यापक नानाभाऊ नाणेकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनिल वीर व सर्व सदस्य तसेच शिक्षक सुनिल निचित ,गोरक्षनाथ नाणेकर ,श्रीकांत निचित,विठ्ठल देशमुख ,कमल वीर, सरला फुंदे ,कविता निचित यांनी केले.

सुनिल चव्हाण यांचा सन्मान



आर्णी ■ धनराज पवार

यवतमाळ येथील नामवंत डॉ.निशांत चव्हाण यांचे वडील श्री. टि.एस.चव्हाण सर माजी मुख्याध्यापक यांचा पंच्याहत्तरवा वाढदिवस शिव आश्रम स्वरा फॉर्म हाऊस भारी यवतमाळ येथे डॉ.निशांत चव्हाण सौ.शीतल नि.चव्हाण डॉ. षडज चव्हाण सौ. स्मुर्ती ष.चव्हाण यांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. श्री. टि.एस.चव्हाण सरांची जीवन गाथा संघर्षमय कहाणी सरांचे माजी विद्यार्थी श्री.विष्णू आडे सर श्री.ओमप्रकाश पवार सर.श्री.विठ्ठल राठोड सर प्रा.अर्चना चव्हाण यांनी अतिशय भावनिक अशा शैलीत कथन केली.या सोहळ्यात सिनेकलावंत श्री सुनिल रामचंद्र चव्हाण रा. माळेगांव तह.आर्णी जी.यवतमाळ यांनी स्त्री व पुरूष च्या आवाजात गीत गाऊन श्रोते मंडळींना आश्चर्य चकित केले.चव्हाण परिवाराच्या वतीने श्री. टि.एस.चव्हाण सरांच्या हस्ते सुनिल चव्हाण यांना शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सन्मानित करण्यात आले.सूत्र संचालन खुशबू भालेराव हीनी केलेआजचा हा बाबांचा वाढदिवस एक प्रेरणा देणारा दिवस म्हणून साजरा करीत असून आलेल्या सर्व पाहुणे मंडळीचे सौ. स्मुर्ती चव्हाण यांनी अभिनंदन करून आभार मानले

वडगांवशेरी मध्ये रंगला आदेश बांदेकर यांचा खेळ मांडियाला कार्यक्रम संकेत गलांडे यांच्या तर्फे आयोजन हजारो महिलांची उपस्थिती!

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर





(पुणे) वाघोली : जागतिक महिला दिन निमित महाराष्ट्र प्रदेश विद्यार्थी कांग्रेस चे संकेत गलांडे यांच्या तर्फे महाराष्ट्राचे लाडके भाऊजी आदेश बांदेकर यांचा खेळ मांडियाला होम मिनिस्टर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमा साठी हजारोहून अधिक महिला उपस्थित होते. आदेश बांदेकर यांनी विविध स्पर्धा घेऊन महिला सोबत संवाद साधला. महिलांनी मनमुराद हसून आनंद घेतला.

स्पर्धे मध्ये प्रथम क्रमांक सौ मनीषा कोहिनकर यांनी पटकावला अष्टेकर ज्वेलर्स तर्फे सोन्याची नथ व कलाशेत्रम तर्फे मानाची पैठणी तसेच दुसरा क्रमांक सौ रविना कांबळे यांना अष्टेकर ज्वेलर्स तर्फे चांदी चा छला व कलाशेत्रम पैठणी व तिसरा क्रमांक सौ मयुरी संदीप वीर यांना अष्टेकर ज्वेलर्स तर्फे चांदीचे भेट वस्तू व कलाशेत्रम पैठणी देऊन गौरविण्यात आले.

यावेळी विविध क्षेत्रातील महिलांना आदर्श महिला पुरस्काराने गौरविण्यात आले.

यामध्ये श्रीमती ठाकूबाई उकिरडे (आदर्श माता) किरण तावरे मॅडम (शिक्षण) डॉ भारती ढोरेपाटील (वैद्यकीय) सौ रतन थोरात (व्यवसायिक) कु काव्य हारगुडे (क्रीडा) यांना आमदार बापूसाहेब पठारे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी येथे सुरेंद्र पठारे,दिलीप देवकर ,अतुल अष्टेकर ,प्रथमेश गाडवे, देविदास निकाळजे, प्रतीक उकिरडे, श्रीरंग लंघे ,राजेश देवकर, विनोद गलांडे, गीता साळुंखे, चांगुलपाई मॅडम आदी उपस्थित होते.सूत्रसंचालन सुप्रिया म्हस्के यांनी केले.

राज्यस्तरीय टीमची कायाकल्प अंतर्गत ग्रामीण रुग्णालयाला भेट



दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे

उरण : इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण येथे राज्यस्तरीय कायाकल्प टीमनी भेट दिली. यामध्ये डॉ. मिथुन खेरडे, डॉ. अमृता मॅथ्यु व डॉ. किरण शिंदे व श्रीम. वावरे सिस्टर यांनी भेट दिली.या प्रसंगी डॉ. बाबासो काळेल वैदयकिय अधिक्षक, डॉ. मृणालिनी कदम, डॉ. प्रकाश हिमगिरे तसेच रुग्णालयाचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सदर दिवशी राज्यस्तरीय टीमने सुरुवातीला इंदिरा गांधी रुग्णालयातील बाहेरील स्वच्छता, कंपाऊड, बगीचा, पोस्ट मार्टम रुम, निर्लेखन रुम, रुग्णवाहीका स्वच्छता, पार्किंगची पाहणी केली. त्यानंतर रुग्णालयातील औषध वितरण विभाग,औषध साठा रुम, आयुष विभाग, वैदयकिय अधिकारी विभाग इंजेक्शन विभाग, कार्यालय, प्रयोगशाळा विभाग, दंत विभाग, सर्व शौचालयाची स्वच्छता,ऑपरेशन थेटर, प्रसुती कक्ष, महिला वार्ड, पुरुष वार्ड, टीबी विभाग, मलेरिया विभाग, आरबीएसके विभाग, आयसीटीसी व लिंक एआरटी विभाग, डोळे तपासणी विभाग, अशा सर्व प्रकारच्या विभागात जावुन टीमने संबधीत विभागाच्या कर्मचा-याच्या कामाची माहिती, सर्व रजिस्टरची तपासणी व स्वच्छतेची पाहणी केली.

तसेच या टीमने रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कामाचे समाधान व्यक्त केले. तसेच आणखी सुधारणा करण्यासाठी काही सुचना सुध्दा देण्यात आल्या.तसेच वैदयकिय अधिक्षक डॉ. बाबासो काळेल यांनी केलेल्या कामाचे कौतुक करण्यात आले.

श्री गुरु बुद्धी स्वामी महाविद्यालय पूर्णा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी

परभणी ■ अरविंद कांबळे

परभणी : पूर्णाःआज दिनांक १२ मार्च २५. श्री गुरु बुद्धी स्वामी महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती संस्थेचे सचिव अमृतराजी कदम, प्राचार्य डॉ. के. राजकुमार ,उपप्राचार्य डॉ. गजानन कुरुंदकर महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमानिमित्त कार्यक्रमाधिकारी डॉ. पुष्पा गंगासागर यांनी त्यांच्या जीवन कार्यावर माहिती सांगितली.देवराष्ट्रे ,सांगली जिल्हा नोव्हेंबर १९८४ हे महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि एक राष्ट्रीय नेता होते, तसेच त्यांनी काही काळ भारताचे उपपंतप्रधान आणि संरक्षणमंत्री म्हणूनही काम केले. बहुआयामी व्यक्तिमत्व होतो साहित्यिक , राजकारणी व समाजकारणी नेते होते, त्यांनी शिक्षणाचे महत्त्व समजून घेतले त्यामुळे महाराष्ट्रामध्ये त्यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना केली. यशवंतराव चव्हाण हे लोकनेते म्हणून ओळखले जातात, त्यांनी महाराष्ट्राच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राला तसेच देशाला फक्त कायदा व सुव्यवस्था या स्वरूपाच्या प्रशासनाची गरज नसून, विकासाभिमुख प्रशासनाची गरज आहे. हे ओळखणाऱ्या द्रष्ट्या व्यक्तींमध्ये यशवंतराव अग्रगण्य होते. विकासाभिमुख प्रशासनाची गरज ओळखण्यामध्ये यशवंतरावांचे जसे द्रष्टेपण होते तसेच ते महाराष्ट्र राज्यामध्ये त्याची यशस्वी अंमलबजावणी करण्यात देखील होते. प्रशासनाची एक वेगळीच छाप दाखवून, त्याचा आदर्श वस्तुपाठ यशवंतरावांनी देशपातळीवर घालून दिला होता. 'सामान्य माणूस' हा त्यांच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक नीतीचा केंद्रबिंदू होता. त्यांनी देशपातळीवर महाराष्ट्र राज्याचा 'एक प्रागतिक राज्य' असा लौकीक त्यांनी निर्माण केला.

आमदार महेश बालदी यांना मातृशोक; गंगादेवी बालदी यांचे निधन; उरण मध्ये शोकसभेचे आयोजन

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी ■ विठ्ठल ममताबादे



उरण : उरण विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार महेश बालदी यांच्या मातोश्री गंगादेवी रतनलाल बालदी यांचे अल्पशा आजाराने शुक्रवारी (दि. १४) सकाळी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९० वर्षांच्या होत्या.

आमदार महेश बालदी यांच्या मातोश्रींचे निधन झाल्याचे वृत्त समजताच भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व त्यांच्या पत्नी वर्षा ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, खालापूर तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, प्रकल्पग्रस्तांचे नेते स्व. दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, वहाळ साई मंदिराचे संस्थापक रवीशेठ पाटील,यांच्यासह पोलीस अधिकारी, इतर विविध क्षेत्रांतील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध हिंदुत्ववादी संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते, विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच नागरिकांनी गंगादेवी बालदी यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली. आणि परिवाराचे सांत्वन केले.

कै. गंगादेवी बालदी यांच्या पार्थिवावर सायंकाळी उरण येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.रविवार दिनांक १६ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत यु. ई. एस स्कुल (पालक मैदान)बोरी उरण रोड येथे शोकसभा आयोजित करण्यात आली आहे.

समृद्धी महामार्गावर पिकअपची कन्टेनरला धडक अन गोमांस तस्करीचा पर्दाफाश

घटनास्थळी बजरंग दल व विश्व हिंदू परिषदचे स्वयंसेवक आक्रमक,समृद्धी महामार्ग बनला गोमांस व अवैध धंद्यावाल्यासाठी ठरतोय तस्करीचा मार्ग

गंगापूर ■ सुनिल झिंजुर्डे पाटील



गंगापुर : गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशनजवळ समृद्धी महामार्गावर पिकअप व कंटेनरचा अपघात झाला आणि वाहनातून गोमांस वाहतूक केली जात असल्याचे बिंग फुटले ही बातमी बजरंग दल व विश्व हिंदू परिषद स्वयंसेवकांना कळताच ते तात्काळ घटनास्थळी दाखल झाले मात्र अपघातग्रस्त पिकअप (एम. एच. १४ एल.एल.४२१५) मध्ये चालक गुतल्याने समृद्धी महामार्गाच्या कर्मचारी व बजरंग दल तसेच कार्यकर्त्यांनी चालकाला अक्षरशः गाडी कापून बाहेर काढले त्यानंतर छुप्या मार्गाने गौमांस वाहतूक होत असल्याने स्वयंसेवक आक्रमक झाले होते मात्र शिल्लेगाव पोलिसांच्या मध्यस्थीने स्वयंसेवक शांत झाले.

ही गोमांस तस्करी इतकी शीतफिने केली जाते की कोणालाही संशय येऊ नये म्हणून पिकअप गाडीत खाली हौद करून त्यात गोमांस बर्फाच्या लाद्यात रचले जाते रक्त बर्फाचे पाणी रस्त्यावर पडू नये म्हणून टाकीही केली जाते अन् त्यावर गोण्या टाकून छुप्या पद्धतीने ही गोमांसाची वाहतूक केली जाते व खाली हौदात जागोजागी पाईप काढून सर्व पाणी एका ठिकाणी काढून लघुशंकेच्या निमित्ताने थांबल्यावर हे पाणी रस्त्यावरं सोडून दिले जाते व कडेकडेने जनावराच्या खाद्याच्या गोण्या रचल्या जातात त्यामुळे कोणालाही गोमांस तस्करीची शंका येत नाही मात्र रविवारी दुपारच्या सुमारास या वाहनाचा अपघात झाला अन् गोमांस वाहतुकीचे बिंग फुटले.या घटनेत गाडीचा चालक नंदू वाल्मिक गांजवे (वय ३५) रा.साकुर ता.संगमनेर व क्लीनर साहील मोहंमद शेख (वय २५)रा. संगमनेर हे दोघे जखमी झाले होते घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी शिल्लेगाव पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस, उपनिरीक्षक योगेश खटाने, बिट अंमलदार तात्याराव बेद्रे, राजेंद्र निसर्ग, विष्णू जाधव आदींनी धाव घेतली वं महामार्ग सुरक्षा बलच्या सहाय्याने जखमींना बाहेर काढत रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले मात्र चालकाचा उपचारादरम्यान घाटी दवाखान्यात मृत्यू झाला.

दरम्यान विश्व हिंदू परिषद, बजरंग दलच्या स्वयंसेवकांनी पंचनाम्यानंतर अंदाजे ४ ते ५ हजार किलो गोमांस विधिवत खड्डा घेऊन त्यात मीठ, वं कोरे कापड टाकत दफन केले यावेळी वैजापूर बजरंग दल चे अध्यक्ष गणेश गोंडे, टायगर ग्रुपचे अध्यक्ष सुरेश साळुंखे,सचिन धुदाट,अजय पाटील साळुंके,अनिकेत अर्नाजेलम, ऋषिकेश जाधव बजरंग दल गंगापूर तालुका अद्यक्ष,परमेश्वर शेजुळ, मनोज पवार,अर्जुन लाड,मनोज जगदाळे, गणेश जाधव,ऋषिकेश सुपेकर, रोहीत थोरात,चेतन पगार,वाल्मीक थोरात आदींची उपस्थिती होती.

समृद्धी महामार्गावरील टोलनाक्यावरील कर्मचारी व महामार्ग पोलिस करतात काय.....

दरम्यान समृद्धी महामार्गावर जागोजागी टोलनाके व महामार्ग पोलीस यांची नियुक्ती केलेली आहे गोमोस वाहतूक करणाऱ्या गाड्या या कन्नड, छत्रपती संभाजीनगर,वैजापूर येथून गोमांस गाडीत भरून वाहतूक करतात ज्या ज्या ठिकानावरून हे वाहने समृद्धी महामार्ग चढतात त्या त्या ठिकाणावर टोलनाक्यावरील कर्मचारी काय करतात तसेच महामार्ग पोलीस हे गाड्यांची तपासणी करत नाही का की या सर्वांचे अर्थपूर्ण संबंध या तस्करांशी आहे असा सुरही बजरंग दल व विश्व हिंदू परिषदचा स्वयंसेवकांनी काढला होता.

अजय पाटील साळुंके :- समृद्धी महामार्ग अशी सोप्या पद्धतीने जर गोमास तस्करी होत असेल तर विश्व् हिंदू परिषद व बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी अशा गाड्या पकडले तर पोलिसांनी स्वयंसेवकांना मदत करावी होतात काळ गोमांस तस्करी करणाऱ्या वाहनावर कायदेशीर कारवाई करावी नसता लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही साळुंखे यांनी दिला आहे.

सुसंस्कृत समाज निर्मितीसाठी स्व. सौ वेणूताई चव्हाण यांचा आदर्श महत्त्वाचा :. सौ. सुनंदा राजेंद्र पवार (बारामती)

कराड ■ कुलदिप मोहिते



कराडः प्रत्येकाला कर्तृत्व सिद्ध करून यश मिळविण्याची उमेद असते. यासाठी आपल्यासमोर आदर्श असावा लागतो. तो आदर्श म्हणून स्व.सौ. वेणूताई चव्हाण व यशवंतराव चव्हाण यांचा आदर्श समाजाने घेण्याची आज नितांत गरज आहे. तसेच सर्वांनी स्वतः आनंदी, सुखी, समाधानी जीवन जगावे व दुसऱ्यांनाही हे सुख आनंद मिळवून देण्यासाठी सदैव प्रयत्न करावा. समाजाने एकत्रितपणे महिलांना समान संधी, आदर आणि सुरक्षा देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण सर्वजण प्रतिज्ञा करूया की आपण महिलांच्या हक्कांचे रक्षण करू आणि समान समाज निर्माण करू.'असे प्रतिपादन . सौ. सुनंदा राजेंद्र पवार (वहिनी) विश्वस्त, कृषी विज्ञान केंद्र, बारामती यांनी केले. त्या श्री शिवाजी शिक्षण संस्था, उच्च शिक्षण मंडळ, कराडचे वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड व सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कऱ्हाड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्व. सौ. वेणूताई यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी निमित्ताने कर्तृत्ववान महिला सन्मान सोहळा प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी . . बाळासाहेब पांडुरंग पाटील माजी सहकार व पणनमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, सातारा जिल्हा, अध्यक्ष, श्री. शिवाजी शिक्षण संस्था, कराड, कार्यकारी विश्वस्त, सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कऱ्हाड हे होते सौ. सुनंदा पवार पुढे म्हणाल्या की, 'स्व.सौ. वेणुताई चव्हाण यांचे समाज जीवनामध्ये खूप मोलाचे योगदान राहिलेले आहे. त्यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. या उपक्रमांची सुरुवात कर्तुत्वान महिलांचा सन्मान करून केली जात आहे, हा एक स्तुत्य उपक्रम आहे. अलीकडच्या काळात महिलांची सुरक्षितता हा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून कर्तुत्वान महिलांनी मुलींच्या सुरक्षिततेसाठी, आरोग्यासाठी आणि एकूणच आत्मनिर्भरतेसाठी व्यापक स्वरूपात प्रयत्न करण्याची गरज आहे. त्याचबरोबर शिक्षण, वृक्ष लागवड, जलसंधारण, आई-वडिलांची सेवा, नात्या नात्यातील संवाद, तंत्रज्ञानाचा मर्यादित वापर या अनुषंगाने महिलांमध्ये जनजागृती करण्याची गरज आहे. हे कार्य या कर्तुत्वान महिलांनी करावे.'

याप्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना बाळासाहेब पाटील म्हणाले की, स्व. सौ. वेणूताई चव्हाण आणि स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या कार्य व कर्तृत्वाचा वसा जोपासण्यासाठी आणि समाजासाठी आपण काहीतरी देणं लागतो. म्हणून असे उपक्रम राबविणे महत्वाचे आहे. स्व. वेणूताई चव्हाण जन्मशताब्दी निमीत्ताने वर्षभर असे अनेक उपक्रम राबविले जाणार आहेत.'

याप्रसंगी कराड परिसरातील सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, पर्यावरण, प्रशासकीय, वैद्यकीय, आदिवासी, कायदा व सुव्यवस्था, राजकीय, कृषी, पशुधन, स्वच्छता, साहित्य, आध्यात्मिक, लोककला, न्यायपालिका, उद्योजकता, सहकार, बचतगट, पत्रकारिता, नृत्य, अभिनय, क्रीडा इत्यादी क्षेत्रात उत्तुंग कार्य करणाऱ्या ३९ कर्तुत्वान महिलांचा सन्मान प्रमुख पाहुणे व अध्यक्षांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह, पुष्प, देऊन करण्यात आला.

याप्रसंगी व्यासपीठावर श्री शिवाजी शिक्षण संस्था, उच्च शिक्षण मंडळ, कराडचे जनरल सेक्रेटरी . अल्ताफहुसेन नसिरुद्दीन मुल्लासाहेब, श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट कराडचे अध्यक्ष जयंत पाटील (काका), सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कऱ्हाडचे खजिनदार नंदकुमार लक्ष्मणराव बटाणे, श्री शिवाजी शिक्षण संस्था,उच्चशिक्षण मंडळ, कराडचे विश्वस्त व सदस्य अरुण पांडुरंग पाटील (काका), मा. दिलीपभाऊ चव्हाण, श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्टचे संचालक चंद्रकांत हिंगमिरे, श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्टचे खजिनदार संजय बदीयानी, यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराडचे प्राचार्य डॉ. एस. बी. केंगार इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागतगीत, दीपप्रज्वलन व प्रतिमापूजनाने करण्यात आली. त्यानंतर सौ. संगीता साळुंखे (माई), डॉ. सौ. सविता मोहिते यांनी प्रतिनिधिक मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्र. प्राचार्य प्रा. (डॉ.) श्रीमती स्वाती सरोदे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. (डॉ.) श्रीमती मृणालिनी शिंदे यांनी करून दिला. कार्यक्रमाचे आभार नंदकुमार लक्ष्मणराव बटाणे विश्वस्त व सदस्य, सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, कऱ्हाड यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रीमती एस. पी. पाटील, प्रा. श्रीमती टी. टी. सरकाळे यांनी केले.

सदर कार्यक्रमासाठी कराड परिसरातील बहुसंख्य नागरिक तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, सेवक, विद्यार्थी, विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्ञानेश्वरी सप्ताह सुवर्णमहोत्सवी सोहळ्याची सोनगावात जय्यत तयारी

कुडाळ ■ प्रतिनिधी



कुडाळ दिः जावळी तालुक्यातील सांप्रदायकाची परंपरा असलेल्या सोनगाव या ठिकाणी दरवर्षी ज्ञानेश्वर पारायण सोहळा आयोजित केला जातो. यंदाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह श्री ग्रंथराज ज्ञानेश्वर सामुदायिक पारायण सोहळा गुरुवार दिनांक २० मार्च ते गुरुवार दिनांक २७ मार्च या कालावधीमध्ये श्री विठ्ठल मंदिर, सोनगाव ता. जावळी जिल्हा सातारा या ठिकाणी आयोजित केला असल्याची माहिती अध्यक्ष मयूर देशमुख यांनी दिली आहे.

गुरूवारी सकाळी आठ वाजता कलश व वीणा पूजन होईल आणि ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहास प्रारंभ होईल.

पारायण सप्ताह कालावधीत पहाटे पाच ते सात या वेळेत काकडा आरती, सकाळी आठ ते अकरा आणि दुपारी दोन ते पाच या वेळेत ज्ञानेश्वरी सामुदायिक वाचन, सायंकाळी पाच ते साडेपाच या वेळेत प्रवचन, साडेपाच ते साडेसहा या वेळेत हरिपाठ, सायंकाळी सात ते नऊ या वेळेत किर्तन आणि रात्री नऊ नंतर जागर, असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहे .

ह.भ.प. अंगद महाराज चव्हाण व्यासपीठ चालक आहेत. गुरूवारी (ता. २०) सायंकाळी ह.भ.प. शिवलिलाताई पाटील यांचे किर्तन होणार आहे .

शुक्रवारी ह.भ.प. संजय महाराज वेळूकर, शनिवारी ह.भ.प. माऊली महाराज पठाडे, रविवारी ह.भ.प. बाळू महाराज गिरगावकर, सोमवारी ह.भ.प. विशाल महाराज खोले, मंगळवारी ह.भ.प. महंत प्रमोद महाराज जगताप, बुधवारी ह.भ.प. अक्रूर महाराज साखरे यांचे किर्तन होणार आहे.

गुरूवारी (ता. २७) सकाळी आठ ते नऊ या वेळेत ज्ञानेश्वरी ग्रंथ वाचन सांगता, नऊ ते अकरा या वेळेत ह.भ.प .उमेश महाराज किर्दत यांचे किर्तन होणार आहे. सायंकाळी चार वाजता दिंडी सोहळा होणार आहे .

याप्रसंगी उपमुख्यमंत्री व जावळीचे सुपुत्र नामदार एकनाथ शिंदे, खासदार श्रीमंत छत्रपती शिंदे उदयनराजे भोसले, पालकमंत्री शंभूराज देसाई, बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, माजी जलसंपदा मंत्री शशिकांत शिंदे, वसंतराव मानकुमरे, दीपक पवार, ऋषिभाई शिंदे, सौरभ शिंदे, अमित कदम, अशोक माटेकर, श्रीकांत पाखरे उपस्थित राहणार आहेत.

पारायण सप्ताह कालावधीतील सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पारायण समितीचे अध्यक्ष मयूर रामदास देशमुख व खजिनदार गणपत बाळू शिंदे यांच्या सह सोनगाव ग्रामस्थांनी तसेच वारकरी संप्रदायाच्या सर्व मान्यवरांनी केले आहे केले आहे.

..आदिनाथ ठोंबरे यांचा स्तुत्य उपक्रम..; जयदत्त पानपोई भागवते शेकडो वाटसरूंची तहान

आष्टी ■ आदिनाथ ठोंबरे



आष्टी : कैलासवासी माणिक दत्तू ठोंबरे यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेली जयदत्त पानपोई भागवते शेकडो वाटसरूंची तहान. ही जयदत्त पानपोई देऊळगाव घाट व शेडाळा गावाच्या मध्यावर्ती आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेले नाथ भक्त, हे याच रोड नी मच्छिंद्रनाथ गडाकडे जात असतात, त्यामुळे दुपारच्या कडक उन्हात या जयदत्त पानपोई चा नाथ भक्तांना आधार होतो. या पानपोई वरती दररोज शेकडो वाटसरू पाणी पिण्यासाठी थांबत असतात.

हि जयदत्त पानपोई आपल्या वडिलांच्या म्हणजेच कैलासवासी माणिक दत्त ठोंबरे यांच्या स्मरणार्थ त्यांचा मुलगा सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार आदिनाथ ठोंबरे यांनी उभारल उभारलेली आहे. या त्यांच्या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या जयदत्त पानपोई चे हे तिसरी वर्ष आहे. या रखरखत्या उन्हामध्ये हि पाणपोई येणाऱ्या जाणाऱ्याचे कित्येकांची तहान भागवते. त्यामुळे सर्वत्र आदिनाथ ठोंबरे यांचे कौतुक होत आहे.

आज आम्ही सहकुटुंब मच्छिंद्रनाथ गडाकडे जात असताना, पाणी पिण्यासाठी याच जयदत्त पानपोई वरती थांबलो होतो. आम्ही भर उन्हामध्ये पाणी पिऊन तृप्त झालो.

पुणे...शीतल कोठुळे

राजकारणातील नैतिकता जोपासण्याचे काम मतदार म्हणून नागरिकांचे हातात

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : विदर्भ ही संतांची भूमि हया विदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगेबाबा, संत लहानुजी महाराज, केजाजी महाराज, गजानन महाराज यासारखे मोठमोठे संत हया विदर्भाच्या भूमित असल्याने ही खरोखरच संतांची भूमि आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हांचे कार्य हे ग्रामीण भागातील विकासाला चालना देणारे आहेत. त्यांनी आपल्या ग्रामगीतेतून खेडयाच्या विकासालाच चालना देणारे विचार मांडले आहेत. एवढेच नाही तर आष्टी-चिमूर या ठिकाणचा स्वातंत्र्याच्या लढयातील रणसंग्राम आजही आपल्या भागातील लोकांना आठवतो. हया रणसंग्रामात आष्टीला ६ जण शहीद झालेत, अशा या राष्ट्रसंतांच्या विचारांनी देश चालावा. गाडगेबाबाच्या व्यसनमुक्ती, शिक्षणप्रसार व अंधश्रध्दा निर्मूलनाचे कार्य आठवून आपण अंधश्रध्दा सोडावी. श्रध्दा असावी पण अंधश्रध्दा नसावी असे प्रतीपादन खासदार श्री अमर काळे हयांनी वर्धा येथील मातोश्री सभागृहात धुलीवंदन निमित्ताने आयोजित कार्यक्रमात केले.

आज शिवपुराण कथेत सांगितलेले बेलाचे पानाची कथा ऐकून टाळया वाजवणाऱ्या स्त्रियांकडे पाहतांना स्त्रियांना शिक्षण देण्यासाठी हाडाची काडे करणाऱ्या व आपले आयुष्य पणाला लावणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे डोळयात मृत्यूनंतरही अश्रू येत असतील. इतकेच नाही तर मी राष्ट्रसंताच्या विचाराने प्रेरित असून मी राष्ट्रसंतांच्याच विचाराने पुढे जाईल असेही प्रतिपादन त्यांनी केले. राजकारणातील नैतिकता लयाला गेली असून ही नैतिकता टिकविण्याचे व राजकारणाला एक गतवैभव प्राप्त करुन देणे हे केवळ तुम्हा सर्व सामान्य मतदार म्हणून कर्तव्य बजावणा-या नागरिकांच्याच हातात आहे असेही मत त्यांनी व्यक्त केले.

मी तीन वेळा आमदार, माजी आमदार व आज खासदार म्हणून राष्ट्रसंताच्या प्रेरणेने होणाऱ्या कार्यक्रमाला सतत हजर राहत असतो. आयोजक मला आठवणीने निमंत्रीत करतात त्यामुळे मी त्यांचे आभार मानतो व स्वतःला पण धन्य समजतो.

या कार्यक्रमात संत सयाजी महाराज, प्रकाश वाघ महाराज, मयुर महाराज अभ्युदयजी मेघे, अविनाशजी काकडे, पिपरीच्या सरपंच श्रीमती वैशालीताई गौळकार, बाळासाहेब मिसाळ, श्री नरेडी, संदीप चिझाटे, श्री दंडारे गुरुजी, श्री. संजय ठाकरे राष्ट्रसंतांचे विचाराने प्रेरित होऊन सतत कार्यात वाहून घेणारी वर्धा येथील मंडळी तसेच बाहेरगावावरुन आलेली भजनी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाच्या शेवटी अनेक भजनी मंडळाच्या पाहुण्यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

श्रध्देचे रुपांतर अंधश्रध्देत होऊ देवू नका : अमर काळे, खासदार

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : देशात सध्या श्रध्देच्या नावावर अंधश्रध्दा पसरविण्याचे काम सुरु असून देवाला वेलाचे पान वाहले की मुलगा परीक्षेत पास होतो असा अपप्रचार सध्या केला जात आहे. त्यामुळे स्त्रियांनी श्रध्दावान असावे, अंधश्रध्दावान असू नये. माझी सुध्दा देवावर श्रध्दा आहे पण मी माझे श्रध्देचे रुपांतर अंधश्रध्देत होवू देणार नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगे महाराज हयांनी अंधश्रध्दा निर्मूलन, व्यसनमुक्ती शिक्षणाचा प्रसार, स्वच्छता हया चारही गोष्टीमध्ये महत्वपूर्ण कार्य केले आहे. गाडगेबाबा तर स्वतः अशिक्षित असून ते शिक्षणाविषयी नेहमी लोकांना उपदेश करत असत. असे प्रतिपादन खासदार श्री. अमर काळे हयांनी सुरगाव त. सेलू येथील धुलीवंदन दिनाचे निमित्ताने आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून केले.

सुरगाव-सेलू येथे गेल्या २८ वर्षापासून रंगाविना धुलीवंदनाचा दिवस राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हयांचे विचाराने प्रेरित होऊन हा कार्यक्रम आयोजत केला जातो. हया प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून तेथील प्रार्थना मंदिरात आयोजित कार्यक्रमामधून ते बोलत होते.

पुढे त्यांनी सतीजाण्याची प्रथा राजा राममोहन राय हयांनी कशी बंदी केली तर स्त्रियांना शिक्षणाचे धडे रुजवतांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, हयांना किती त्रास झाला, समाज त्यांना कसा त्रास देत होता. पण त्यांनी त्याही परिस्थितीला सामोरे जाऊन स्त्रियांच्या जीवनात शिक्षणाने किती क्रांती घडवून आणली हयाचे महत्व पटवून दिले. एवढेच नाही तर राष्ट्रसंतांनी आष्टी व चिमूर येथील स्वातंत्र्याचा रणसंग्राम कसा घडवून आणला. राष्ट्रसंताचे विचार बाल आणि आज देशाच्या विकासासाठी किती महत्वाचे आहे हे सांगीतले.

मी शेतकऱ्यांच्या सोयाबीन तूर, कापूसचा भावाबाबत असो की मनीपूर मध्ये घडलेल्या हिंसाचाराचा विषय असो लोकसभेत प्रश्न उपस्थित करताच सत्ताधाऱ्यांकडून माईक (आवाज) बंद करुन एक प्रकारे विरोधकांना जनतेचे प्रश्न लोकसभेत मांडण्यास मज्जाव करुन सर्वसामान्य जनतेचा आवाजच बंद केला जातो हे केवढे मोठे दुर्दैव आहे असेही त्यांनी या कार्यक्रमाच्या निमित्ताने विरोधी पक्षाचे खासदार म्हणून आपली व्यथा लोकांसमोर व्यक्त केली, हया कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून भाऊसाहेब थुटे प्रमुख पाहुणे म्हणून तिवसाचे आमदार व सुरगावचे जावई श्री. राजेंद्र देशमुख हे हजर होते. हया कार्यक्रमाचे आयोजन श्री प्रविण देशमुख व त्यांचे सहकारी मंडळी हयांनी केले होते. त्यांच्या हया कार्याचे सुध्दा सर्वाकडून कौतुक करण्यात आले. काही विद्यार्थी व नागरीकांचा सत्कार सुध्दा खासदार श्री अमरभाऊ काळे हर्याचे हस्ते करण्यात आला. हया कार्यक्रमात सेवाग्राम आश्रमचे पदाधिकारी व किसान अभियानचे प्रेरक श्री. अविनाश काकडे हयांचे सह स्थानिक व आजूबाजूचे गावातील जनता मोठ्या प्रमाणात उपस्थित होती.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट अभ्यासिका : उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे

माजलगाव ■ दर्शन डोंगरे



माजलगाव : शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे,तो जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. असं शिक्षणाचे महत्त्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले आहे.त्याच अनुषंगाने माजलगाव शहरातील पंचायत समिती जवळील जिल्हा परिषद हायस्कूल शाळेच्या परिसरात महा.राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या प्रयत्नाने तसेच सर्व समाज घटकाच्या सहकार्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका उभारली जात आहे.ही अभ्यासिका बीड जिल्ह्यातील एक आदर्श अभ्यासिका असल्याचे प्रतिपादन उपशिक्षणाधिकारी भगवानराव सोनवणे यांनी व्यक्त केले.

गुरुवार दिनांक १३ रोजी सावित्रीबाई फुले विद्यालयाचे मुख्याध्यापक सचिन वाघमारे यांच्याकडून या अभ्यासिकेसाठी दहा खुर्च्या भेट देण्यात आल्या.याप्रसंगी उपशिक्षणाधिकारी भगवान सोनवणे बोलत होते.कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार व पदाधिकारी तसेच कर्मचारी, शिक्षणप्रेमी यांच्या पुढाकाराने ही अभ्यासिका या ठिकाणी मोठ्या दिमाखात उभारली जात आहे.ही अभ्यासिका उभारण्यासाठी अनेक समाज घटकातील शिक्षणप्रेमी पुढे येत आहेत आणि अभ्यासिका उभारणी कामी सहकार्य करत आहेत ही अतिशय उल्लेखनीय बाब आहे.

माजलगाव शहरातील होतकरू आणि गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी ही अभ्यासिका लाभदायक ठरणार आहे.शिक्षण हे समाजातील तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे हा उद्देश ठेवून या अभ्यासिकेची निर्मिती करण्यात येत आहे.सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना महागड्या अभ्यासिका लावण्याऐवजी या अभ्यासिकेचा नक्कीच फायदा, उपयोग होणार आहे.

यावेळी माजलगावचे गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी, गेवराईचे मा.गटशिक्षणाधिकारी मिलिंद तुरुकमारे, कादेसर, केंद्रप्रमुख शिवाजी बलशेठवार,साधन व्यक्ती लक्ष्मण पोटभरे,रवी आदमाने,जिजाऊ शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन विलास शेजुळ,मराठा सेवा संघाचे अध्यक्ष उत्तम पवार,निवेदक कवी अशोक वाडेकर,प्रभाकर साळवे,राजाभाऊ वाघमारे,सुमंत राऊत,गौतम घनघाव, रमेश जाधव, खळगे सर,लोखंडे सर यांची उपस्थिती होती.

डॉ बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका निर्माणाधीन आहे. तेव्हा या अभ्यासिकेचा लाभ सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावा.असे आवाहन या अभ्यासिकेचे प्रमुख राहुल टाकणखार यांनी केले आहे.

शेकडो नागरिकांचे जनता दरबारातून समाधान; पालकमंत्री डॉ. भोयर यांनी परंपरा कायम ठेवली ;जिल्हाभरातून सामान्यजनांची तोबा गर्दी

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : राज्यमंत्री म्हणून राज्यभर कर्तव्याची पूर्तता करतानाच गृह जिल्ह्यातील सामान्य जनांचे प्रश्न ही तत्परतेने सुटावे, याकरिता राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी रविवारी, १६ मार्च रोजी 'जनता दरबारा'चे आयोजन करून आपली परंपरा कायम ठेवली. जनतेच्या प्रश्न - समस्यांशी निगडित विविध प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत शेकडो प्रश्नांचा तत्काळ निपटारा करण्यात आला, तर तेवढ्याच प्रश्नांना सोडविण्याकरिता पालकमंत्र्यांनी प्रशासकीय यंत्रणेला कामाला लागण्याचे निर्देश दिले.

आमदार म्हणून डॉ. पंकज भोयर यांनी सतत जनता दरबाराचे आयोजन करून जनतेचे प्रश्न सोडविले होते. त्यांनी सुरू केलेल्या राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडयाची राज्य पातळीवर दखल घेण्यात आली होती. हा सेवा पंधरवडा संपूर्ण राज्यात राबविण्यात आला होता. नवीन संकल्पना राबवून जनेतेचे प्रश्न सोडविण्याची जिद्द व चिकाटी असलेले डॉ. पंकज भोयर यांनी ही परंपरा अशीच सुरू ठेवली आहे.

जिल्ह्यात पालकमंत्र्यांचा प्रथमच जनता दरबार

आ. भोयर यांचा राज्य मंत्रिमंडळात समावेश होणे ही जिल्ह्यासाठी भूषणावह बाब ठरली आहे. जिल्ह्याचे पालकत्व त्यांच्याकडे आल्याने त्यांनी पालकमंत्री म्हणून देखील जनता दरबाराची परंपरा कायम राखली आहे. जिल्ह्याच्या इतिहासात पहिल्यांदाच पालकमंत्री म्हणून कुण्या नेत्याने जनता दरबाराची संकल्पना प्रत्यक्षात उतरविली.

विकास भवन गर्दीने तुडूंब


जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील विकास भवन येथे आयोजित जनता दरबाराकरिता जिल्ह्यातील गावखेड्यांमधील शेतकरी, कष्टकरी, विविध पक्षीय कार्यकर्ते तसेच शहरांतील विविध क्षेत्रातील नागरिक, व्यावसायिक, शासकीय अधिकारी - कर्मचारी, शासनाच्या विविध उपक्रमांतील अस्थायी कर्मचारी, सामान्यजन, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि युवक आपले विविध प्रश्न - समस्या घेऊन जनता दरबारात मोठ्या आशेने सहभागी झालेत. पालकमंत्री डॉ. भोयर यांनीही प्रत्येकाला वेळ देत त्यांचे प्रश्न समजून घेत त्यावर अधिकाऱ्यांशी चर्चा करीत निराकरणाचा मार्ग सुकर केला.

नागरिकांच्या चेहरा-यावर उमटले स्मीत हास्य

जनता दरबाराच्या माध्यमातून आपली कैफीयत थेट मंत्र्यांनी ऐकून घेत आपल्या समस्या जाणून घेत प्रश्न निकाली काढण्याचा मार्ग सुकर झाला म्हणून नागरिकांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य, समाधान पाहायला मिळाले. पालकमंत्री डॉ. भोयर यांनी नियमितपणे जनता दरबाराचे आयोजन करावे, अशी अपेक्षा सामान्य नागरिकांनी व्यक्त केली. जनता दरबाराला पालकमंत्री यांच्या सह पोलिस अधीक्षक अनुराग जैन, उप विभागीय अधिकारी दीपक करंडे, जिल्हा परिषद च्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानदा फनसे, तहसीलदार संदीप पुंडेकर यांच्या सह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

घोडाझरी तलावात बुडून पाच तरुणांचा मृत्यू

चंद्रपूर ■ प्रतिनिधी



चंद्रपूर : नागभीड तालुक्यातील घोडाझरी तलावात पोहण्यासाठी गेलेल्या जनक गावंडे, यश गावंडे, अनिकेत गावंडे, तेजस गावंडे व तेजस ठाकरे या पाच जणांचा बुडून मृत्यू झाला. ही घटना शनिवारी सायंकाळी चार वाजताच्या सुमारास घडली.

चिमूर तालुक्यातील साठगाव कोलारी येथील रहिवासी असलेली ही सर्व मुले धुलीवंदनानंतर शनिवारची सुटी घालवण्यासाठी नागभीड तालुक्यातील घोडाझरी येथे आली होती. सायंकाळी चार वाजताच्या सुमारास घोडाझरी तलावातून तळोधी बाळापूर पाणी पुरवठा योजनेची टाकी असलेल्या परिसरात ही सर्व मुले पोहत होती. अशातच ही दुर्दैवी दुर्घटना घडली. यात पाच जणांचा मृत्यू झाल्याची माहिती भाजप पदाधिकारी तथा माजी जिल्हा परिषद सदस्य संजय गजपुरे यांनी बोलताना दिली. मृतांमध्ये चिमूर तालुका काँग्रेस समितीचे अध्यक्ष विजय गावंडे यांचे बंधू माधव गावंडे यांची दोन मुले असल्याची माहितीही त्यांनी दिली. पाचही मृत साधारणतः २० ते २५ वयोगटातील आहेत. एकूण सहा जण पोहण्यासाठी उतरले होते. त्यातील एक जण बचावला.

या घटनेसंदर्भात तहसीलदार व ठाणेदार यांनाही माहिती देण्यात आली. त्यांनी घटनस्थळाकडे धाव घेतली. बचाव पथकाला देखील पाचारण करण्यात आले. घटनास्थळी नायब तहसीलदार उमेश कावळे, ठाणेदार कोकोटे, माजी जि.प.सदस्य संजय गजपुरे, तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रमोद चौधरी, नागभीड नगरपरिषदेचे माजी सभापती सचिन आकुलवार, यांच्यासह शेकडो नागरिकांनी गर्दी केली होती. आमदार बंटी भांगडिया यांनी प्रशासनाशी संपर्क साधून याबाबत माहिती घेतली व रुग्णवाहिकेची व्यवस्था करून दिली. मृतदेहांचे शवविच्छेदन झाल्यानंतर कुटुंबीयांना सोपवले जाणार आहे. मृतांपैकी किशोर गावंडे यांचा एक मुलगा जनक सनफ्लॅग कंपनी, वरठी, भंडारा येथे नोकरीवर होता, तर लहान भाऊ यश नागपूरला इंजिनिअरिंगच्या अंतिम वर्षाला शिक्षण घेत होता.

बचत गट भवनाच्या माध्यमातूनष्शासकीय योजनांचा लाभ इतरांना मिळवून द्या : पालकमंत्री डॉ. पंकज भोयर





वर्धा ■ प्रतिनिधी

महिला बचत गट भवन इमारतीचे लोकार्पण

वर्धा : महिला बचत गटाची मोठी चळवळ जिल्ह्यात उभी आहे. गटांच्या बैठका, छोटे छोटे कार्यक्रम घेण्यासाठी महिला बचत भवन असावं ही मागणी होती. आता आपल्या हक्काचं बचत गट भवन उभ राहिल आहे. या भवनाचा उपयोग गटाच्या विकासासाठी करण्यासोबतच महिलांना नवनवीन माहिती तसेच शासकीय योजनांची माहिती द्यावी व त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन राज्याचे गृह (ग्रामीण), शालेय शिक्षण, सहकार, गृहनिर्माण, खनिकर्म विभागाचे राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

सावंगी येथे आमदार डॉ. पंकज भोयर यांच्या निधीतून महिला बचत गट भवन उभारण्यात आले असून या इमारतीच्या लोकार्पण प्रसंगी ते बोलत होते. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष वैशाली येरावार, उमेदचे अभियान व्यवस्थापक नीरज नखाते, माझी सरपंच मीनाक्षी जिंदे, सरिता दोड यांच्यासह बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर पुढे म्हणाले की, महिला बचत गटामध्ये केवळ सदस्य म्हणून सहभागी न होता नवीन नवीन शिकण्याची उमेद निर्माण करा. बचत गटातून महिला उद्योजिका तयार झाल्या पाहिजेत, यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. येणाऱ्या काळात बचत गटातील महिलांचे विविध प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले.

यावेळी बचत गटातील महिलांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभा सहारे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार आरती सूर्यवंशी यांनी मानले.

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते बचतगट भवनाचे लोकार्पण



वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : ग्रामिण जीवन्नोती अभियान अंतर्गत बोरगाव मेघे येथील सुर्योदय प्रभाग संघ कार्यालयाच्या २१ लक्ष रुपये खर्च करुन बांधन्यात आलेल्या बचतगट भवनाचे लोकार्पण राज्याचे गृह निर्माण, गृह (ग्रामीण), शालये शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष्यस्थानी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष वैशाली येरावार होत्या तर जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, ग्रामिण जीवन्नोती अभियान व्यवस्थापक निरज नखाते, माजी पंचायत समिती सदस्य दुर्गाताई ताजने, सुनिता मेघे, विस्तार अधिकारी सुनील गावंडे, नितीन डफरे, कल्याणी वानखेडे आदी उपस्थित होते.

बचतगट भवनातून महिलांनी आपल्या बचत गटाच्या माध्यमातून नाविण्यपूर्ण उद्योग निर्माण करुन आर्थिक प्रगती करावी. केंद्र शासनाने बचत गटाच्या महिलांची आर्थिक उन्नत्ती साधन्यासाठी लखपती दिदी योजना सुरु केली असून या योजनेचा लाभ घेऊत गटातील महिलांनी करोडपती दिदी व्हावे असे आवाहन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले. बचतगट भवनातील वीजबील शून्य करण्यासाठी सोलर सुविधा निर्माण करुन देण्यासाठी प्रयत्न करणार असेही ते पुढे बोलतांना म्हणाले.

यावेळी बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तूचे स्टॉल लावण्यात आले होते स्टॉलला पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी भेट देऊन पाहणी केली. कार्यक्रमाला सुर्योदय प्रभाग संघातील असंख्य महिला बचत गटाच्या महिला उपस्थित होत्या.

शासन सदैव पोलीस पाटीलांच्या पाठीशी : पालकमंत्री डॉ. पंकज भोयर

जिल्हा पोलीस पाटील मेळावा, मार्गदर्शन शिबिर व सत्कार समारंभ

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : पोलिस पाटीलांची गावातील नागरिकांचे आपआपसातील वाद मिटविण्यासाठी समन्वयकांची चांगली भूमिका बजावण्यासोबतच प्रशासकीय कामात गावपातळीवर विविध योजना राबविण्यासाठी मोठी मदत होत असून यासाठी शासन सदैव त्यांच्या पाठीशी आहे. असे प्रतिपादन राज्याचे गृह निर्माण, गृह (ग्रामीण), शालेय शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी जिल्हास्तरीय पोलीस पाटील मेळावा व मार्गदर्शन शिबिरात केले.

वर्धा जिल्हा गाव कामगार पोलीस पाटील संघांच्या वतीने महात्मा लॉन येथे जिल्हा पोलीस पाटील मेळावा मार्गदर्शन शिबिरात सत्कार प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघाचे अध्यक्ष बाळासाहेब शिंदे पाटील, गावकामगार पोलीस पाटील संघाचे वर्धा जिल्हाध्यक्ष अमित लुंगे पाटील, माजी जिल्हाध्यक्ष रमेश ढोकणे, विदर्भ ध्यक्ष विजय गाडगे, गणेश देवळेआदी उपस्थिती होते.

पोलीस पाटील पद हे गावपातळीवर महत्वाचे पद असून गावातील आप-आपसातील वाद मिटविण्याचे कामे करण्यासोबतच शासनाच्या विविध योजना गावपातळीवर राबविण्यासाठी मदत करीत असतात यासाठी त्यांना नेमुन देण्यात येणा-या कामाबाबत कुठल्याची प्रकारच्या मार्गदर्शक सुचना नसल्याने शासन स्तरावर मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणले. कित्येक वर्षापासुन अल्पशा मानधनावर काम करीत असलेल्या या पोलीस पाटीलांच्या मानधनात ६ हजार रुपयावरुन १५ रुपये वाढविण्यात आले असून यापुढे आणखी वाढ करण्यासोबतच त्यांच्या प्रशिक्षण, संरक्षण, व स्वतंत्र कार्यालय अशा विविध समास्यासाठी पाठपुरावा करुन समास्याचे निराकरण करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करणार असल्याचे पुढे बोलतांना डॉ. पंकज भोयर म्हणाले.

वर्धा जिल्ह्यातील पोलीस पाटीलांचे प्रलंबित असलेले प्रवासभत्ता देयके अदा करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. पोलीस पाटीलांनी जबाबदारीने कामे करुन गावातील प्रत्येक नागरिकांना समान न्याय देण्याचे प्रयत्न करावे असे श्री. भोयर म्हणाले.

गावापातळीवरील भांडन, तंटे मिटविण्यासाठी प्रशासनाचा एक दुवा म्हणुन अल्पशा मानधनावर पोलीस पाटील काम करीत असून त्यांना ब-या समस्यांना सामोरे जावे लागत असतात यासाठी त्यांच्या मानधनात शासनाने वाढ करावी, निवृत्तीचे वय ६५ करण्यात यावे, संरक्षण देण्यात यावे, कामांबाबत प्रशिक्षण देण्यात यावे अशी मागणी बाळासाहेब शिंदे पाटील यांनी यावेळी आपल्या मार्गदर्शनातून केली. कार्यक्रमाचे संचालन योगिता गाडगे यांनी केले कार्यक्रमाला जिल्ह्यातील सर्व पोलीस पाटील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंनिसचा लोकजागर स्मशान होलिकोत्सव सदाशिवपेठी भाषा रुजली, बोली लयास गेली : अशोक राणा

'भूतभाषा आणि देवभाषा' यावर व्याख्यान

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : भूतपिशाच्च म्हणून वैदिक, पौराणिक वाङ्मयात ज्यांचा उल्लेख होतो, त्या मूलनिवासी नागवंशियांची भाषा भूतभाषा म्हणून ओळखली जाते. प्रस्थापित वैदिकांच्या संस्कृतीने अवैदिक संस्कृतीतील असुर, राक्षस, दैत्य, दानव, भूत, पिशाच या शब्दांचे अर्थ विकृत करून टाकले आणि देव या शब्दाचे उदात्तीकरण केले. देव हा आर्यांमधीलच एक चतुर वर्ग होता ज्यांची भाषा समाजावर लादल्या गेली. आज सदाशिवपेठेतील भाषा आमची प्रमाणभाषा झाली असून आमच्या मूळ बोलीभाषा मागे पडल्या, अशी साधार मांडणी लोकसंस्कृतीचे अभ्यासक प्रा. डॉ.अशोक राणा यांनी एकोणतिसाव्या लोकजागर स्मशान होलिकोत्सवात केली.

अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीद्वारे स्थानिक स्मशानभूमीत एकोणिसाव्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. राणा यांचे 'भूतभाषा आणि देवभाषा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी विचारमंचावर वरिष्ठ पोलीस निरीक्षक पराग पोटे, अ.भा. अंनिसचे राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य संजय इंगळे तिगावकर, युवा शाखेचे राज्य संघटक पंकज वंजारे, जिल्हाध्यक्ष हरीश इथापे, महिला शाखेच्या जिल्हा संघटक डॉ. सुचिता ठाकरे, पत्रकार मनोज भोयर, प्रवीण धोपटे, जिल्हा सचिव निलेश गुल्हाने, कार्याध्यक्ष प्रा. विद्या राईकवार, उपाध्यक्ष दादाराव मून, डॉ. धनंजय सोनटक्के, प्राचार्य डॉ. चंदू पोपटकर, सहसंघटक आकाश जयस्वाल, सहसचिव अजय इंगोले, रवी पुनसे, आशिष मोडक यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. अशोक राणा पुढे म्हणाले, पैशाची भाषा म्हणजे पिशाचभाषा, राक्षसांची भाषा किंवा भूतभाषा, एक असंस्कृत भाषा किंवा व्याकरणकारांनी वर्णन केलेली एक प्राकृत भाषा, अशा अनेक कल्पना आहेत. आर्यपूर्व काळात गण ही प्रचलित शासन व्यवस्था होती. या गण समाजातील लोक एकोप्याने राहत, सामंजस्याने वागत व एकमेकांच्या विचाराने निर्णय घेत असत. ही आदर्श व्यवस्था आर्यांना मात्र मान्य नव्हती. गणसमाज हा सर्वांच्या हिताचा विचार करीत असे तर आर्यांच्या राज्यव्यवस्थेत राजाचे हित पहिल्यांदा पाहिले जाई. इराणमधून आलेल्या आर्यांनी भारतातील लोकांना जन्मजात भेदांमध्ये गुरफटून टाकले. या भेदाला तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान देणारी मनुस्मृती ज्या भृगू गोत्रातील विद्वानांनी रचली, त्यांनीच महाभारत या महाकाव्याला विकृत केले आणि भृगू गोत्राचा आदर्श म्हणून परशुराम या काल्पनिक पात्राची निर्मिती केली, असेही डॉ. राणा म्हणाले. पुण्यातील सदाशिवपेठी भाषेचा वापर पाठयपुस्तके, प्रसारमाध्यमे व राज्यव्यवहारात झाला असून तिला प्रमाण भाषेचा दर्जा मिळाला. वस्तुतः संत ज्ञानेश्वरांनी ग्रंथांमध्ये अनेकदा बोली भाषेचा वापर केला आहे. छत्रपती शिवरायांचा राज्यव्यवहार बोलीभाषेतील आहे. मात्र आज मराठी भाषा व्याकरणाच्या क्लिष्ट नियमांखाली गुदमरते आहे. तुम्ही असेच बोलावे, तसे बोलू नये, शब्दाचा उच्चार नेमका असा करावा, यातच आपली प्रतिभा लय पावत आहे, अशी खंतही डॉ. अशोक राणा यांनी व्यक्त केली. यावेळी, पराग पोटे यांनीही अंधश्रद्धा निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या अनुषंगाने आपले विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुचिता ठाकरे यांनी केले. अतिथींचा परिचय संजय इंगळे तिगावकर यांनी करून दिला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. निलेश बोबडे व सान्वी वंजारे यांनी केले तर आभार आशिष मोडक यांनी मानले. व्याख्यानापूर्वी इंझाळा येथील उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनी प्रणाली तायडे हिने महामानवांचा वारसा नि भविष्य भारताचे ही नाट्यछटा सादर केली. मारोती चावरे यांनी प्रासंगिक कवितेचे वाचन केले. या होलिकोत्सवाच्या आयोजनात तालुकाध्यक्ष प्रा. एकनाथ मुरकुटे, युवा शाखेचे सचिव सतीश इंगोले, सुनील पाटणकर, अथर्व भिंगारे, सुरज बोदिले, शुभम जळगावकर, विक्रम खडसे, सार्थक लाखे, मनोज गायधने, पी.के. खोबे, पराग दांडगे, सुरज गणवीर, भूषण मसने, ज्ञानेश्वर आटे, जयंत सबाने, स्वराली इंगोले, उत्कर्षा सोनटक्के यांच्यासह अंनिसच्या जिल्हा व तालुका शाखेतील कार्यकर्त्यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले.

क्रिडा संकुल येथे लवकरच सिंथेटिक ट्रॅकची निर्मिती करणार: पालकमंत्री डॉ. पंकज भोयर

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : क्रिडा क्षेत्राचा व खेळाडूचा सर्वांगीत विकास करण्याचे केंद्र व राज्य शासनाचे धोरण आहे. यासाठी जिल्ह्यातील खेळाडूंना देशपातळीवर खेळाचे नाव लौकिक करण्यासाठी तालुका स्तरावर स्टेडिअम तयार करण्यात येणार असून सेलू व आयटीआय टेकडी येथे लवकरच स्टेडीअम तयार करण्यात येणार आहे सोबतच जिल्हा क्रिडा संकुल येथे नवीन सिंथेटिक ट्रक तयार करण्यासाठी निधी मंजूर करण्यात येणार असल्याचे मनोगत राज्याचे गृह निर्माण, गृह (ग्रामीण), शालये शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी क्रिडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या खेळाडूंच्या सत्कार कार्यक्रमात केले.

जिल्हा क्रिडा संकुल येथे जिल्हा व्हॉलीबॉल प्रशिक्षण केंद्र व साई स्फोर्टीग क्लबच्यावतीने क्रिडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या खेळाडूच सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला माजी खासदार रामदास तडस, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड, जेष्ठ व्हॉलीबॉल मार्गदर्शक श्रीराम गव्हाणे, राज्य क्रिडा मार्गदर्शक तथा माजी जिल्हा क्रिडा अधिकारी प्रशांत दोंदल, तालुका क्रिडा अधिकारी संदीप खोब्रागडे, क्रिडा मार्गदर्शक सुनील साकळे, सेवानिवृत्त प्रा. मदन इंगळे, व्हॉलीबॉलचे राष्ट्रीय स्पर्धा पंच नितीन घोडे आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील खेळाडू वेगवेगळ्या क्षेत्रात काम करुन आजही खेळाला प्राधान्य देऊन क्रिडा क्षेत्रात नवीन पिढी घडविण्याचे काम करीत असून या नवीन युवा पिढीनी देशपातळीवर क्रिडा क्षेत्रात नाव लौकिक करावे यासाठी राज्य शासनाच्यावतीने जिल्हयाच्या क्रिडा क्षेत्राच्या विकासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल असे आश्वासन यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिले.

जिल्ह्यातील चांगले खेळाडू निर्माण झाले पाहिजे यासाठी अत्याधुनिक स्टेडीयची आवश्यता आहे यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करणार असून जिल्ह्यात क्रिडा अकादमी निर्माण झाल्यास नवीन खेळाडूंना देशापातळीवर खेळाचे नेतृत्व करण्याची संधी प्राप्त होईल असे माजी खासदार रामदास तडस म्हणाले.

यावेळी व्हॉलीबॉल क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या तसेच जेष्ठ व्हॉलीबॉल खेळाडू, क्रिडा संकुल व्यवस्थापकाचा मान्यवरांचे हस्ते सत्कार करण्यात आला. व्हॉलीबॉल संघटनेचे पदाधिकारी , खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खापा वनपरिक्षेत्रातील मौजा सिरोंजी येथील भनगाळा नाला येथे पट्टेदार वाघाची शिकार

खापा ■ दिलीप येवले





खापाः खापा वनपरिक्षेत्रा अंतर्गत नागलवाडी वन वर्तुळ अंतर्गत कोरमेटा नियतक्षेत्रातील मौजा सिरोंजी हहित भनगाळा नाल्यामध्ये वन्यप्राणी वाघ सदृश्य प्राणी पडुन असल्याबाबत माहिती सिरोंजी येथिल स्थानिक नागरिकांनी एस. डी. गडलिंगे, वर्तुळ अधिकारी, नागलवाडी यांना दिनांक १४/०३/२०२५ दुपारी २.०० वाजता च्या दरम्यान दुरध्वनीव्दारे प्राप्त झाली.

उक्त माहितीच्याआधारे एस. डी. गडलिंगे, वर्तुळ अधिकारी, नागलवाडी, प्रविण लेले, वन परिक्षेत्र अधिकारी, नागलवाडी (वन्यजीव) व इतर वनकर्मचारी घटनास्थळावर पोहचुन घटनेबाबत खात्री केली असता वरिल जागेवर एक नर वाघ मृत अवस्थेत आढळुन आला. याबाबत घटनेची माहिती वरिष्ठ वन अधिकारी भारतसिंह हाडा, उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर व व्हि. सी. गंगावणे, सहाय्यक वनसंरक्षक, नागपूर वनविभाग नागपूर यांना देण्यात आली. बाबत वरिल अधिकारी, तातडीने घटनास्थळावर आले.

सदर क्षेत्रात वन्यप्राणी वाघ मृत अवस्थेत आढळुन आला. वाघाचे निरिक्षण केले असता वाघ हा नर असल्याचे व त्यांचे वय ३ ते ३.५ वर्षाच्या दरम्यान असल्याचे निदर्शनास आले तसेच वाघाचे पायाचे चार पंजे व मिश्या व दात शिका-यांनी नेल्याचे आढळुन आले. प्रकरणी घटना स्थळाच्या आजुबाजुच्या परिसरात पाहणी केली असता परिसरातील ११ के. व्हि. विदयुत वाहीनी वरून लोखंडी तार व बांबु खुंट्यांचे सहाय्याने वन्यप्राणी शिकार करण्याकरीता सापाळा लावल्याचे निदर्शनास आले. सदर साहित्य जप्त करण्यात आले व वाघाची शिकार विदयुत वाहीनी च्या व्दारे करण्यात आल्याबाबत प्राथमिक तपासात दिसुन येत आहे.

सदर मृत वाघाचे शवविच्छेन डॉ. राजेश फुलसुंगे, पशुवैद्यकीय अधिकारी, नागपूर, डॉ. मयुर पावशे, पशुवैदयक अधिकारी, ऊण, गोरेवाडा, डॉ. मयंक बरडे, पशु वैदयक अधिकारी, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर, व भारतसिंह हाडा, उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर, व्हि. सी. गंगावणे, मा. सहाय्यक वनसंरक्षक, नागपूर वनविभाग नागपूर, एस. जी. आठवले, वनपरिक्षेत्र अधिकारी, खापा, प्रविण लेले, वन परिक्षेत्र अधिकारी, नागलवाडी (वन्यजीव), कुंदन हाते, प्रधान वन्यजीव विभाग प्रतिनिधी, मंदार पिंपळे ऊर्जे प्रतिनिधी, तसेच स्थानिक जीवशास्त्र तज्ञ श्रीकांत ढोबळे यांचे उपस्थितीत राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (ऊर्जे) च्या मार्गदर्शक निर्देशानुसार करण्यात आले.

वनगुन्हयाच्या तपासणी करीता मृत वाघाच्या शवविच्छेदना दरम्यान व्हिसेरा नमुने गोळा करण्यात आलेले आहे. सदर नमुने हे वन्यजीव प्रयोगशाळेत परिक्षणाकरीता व अज्जूऽ ॅगमूदै ुगदर्हैत इदैाहेग्र्ै, ुज्ले यांच्याकडे पाठविण्यात येणार आहे.

प्रकरणातील आरोपीची कसून शोध घेण्यात येत असुन इतर घटनास्थळी आढळलेल्या साहित्याच्या आधारे व यापुर्वी वन्यजीव वन गुन्हयातील आरोपीच्या आधारे आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. प्रकरणाची चौकशी व तपास व्हि. सी. गंगावणे, मा. सहाय्यक वनसंरक्षक, नागपूर वनविभाग नागपूर व एस.जी. आठवले, वनपरिक्षेत्र अधिकारी खापा हे डॉ. भारतसिंह हाडा, उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग, नागपूर यांचे मार्गदर्शनात करीत आहे. प्रकरणातील कायदा व सुव्यवस्थेकरीता स्थानिक पोलीसांची मदत घेण्यात आली. याकरीता खापा पोलीस स्टेशन अधिकारी गिरी साहेब व सावनेर पोलीस स्टेशन येथील परिक्षाविधीन ठाणेदार मसके घटनास्थळी पोलीस कर्मचा-यासह हजर होते.

करीता खापा वनपरिक्षेत्र सावनेर तालुक्यात वन्यप्राणी शिकार व अवैध वृक्षतोड संबंधीत वनगुन्हे ची माहिती मिळाल्यास सदर माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी यांना देण्याचे आव्हान या प्रेस नोट व्दारे नागरिकांना करण्यात येत आहे.

कर्मचारी लाभ निधिच्या वतीने रेल्वे कर्मचारी महिलांचा जागतिक महिला दिन साजरा



वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त मध्य रेल्वे नागपूर विभागाचे माननीय विभागीय रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग यांच्या मार्गदर्शनाखाली व वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी, नागपूर श्रीमती सांझी जैन यांच्या समर्थ नेतृत्वाखाली, महिला सक्षमीकरण समितीच्या वतीने १२ मार्च रोजी कर्मचारी लाभ निधीच्या सौजन्याने रेल इन्स्टिट्यूट प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. यामध्ये रेल्वेमध्ये काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. कार्यक्रमात विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.सौ.सबा अख्तर, सीएमपी,वर्धा रेल्वे आरोग्य केंद्र उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे संचालन सुरेश पारकल, मुख्य कर्मचारी व कल्याण निरीक्षक, वर्धा व श्रीमती आसमा शेख, कार्यालयीन अधीक्षक, वर्धा यांनी केले. या कार्यक्रमात अनेक स्पर्धा घेण्यात आल्या ज्यात महिलांनी सहभाग घेतला. विजेत्या स्पर्धकांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

विदर्भ साहित्य संघ व यशवंत महाविद्यालयाचे आयोजन शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थिनींनी गाजविले कवयित्री संमेलन





वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा - विदर्भ साहित्य संघ, वर्धा शाखा आणि यशवंत महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित काव्योत्सव गाजविला तो शालेय व महाविद्यालयीन कवयित्रींनी.

स्थानिक यशवंत महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित या एक दिवसीय कवयित्री महासंमेलनाची सुरुवातच विद्यार्थिनींचा सहभाग असलेल्या मुक्ताई सावित्रीआई काव्यसत्राने झाली. या सत्राच्या अध्यक्षस्थानी कथाकार, कवयित्री प्राचार्य मीनल रोहणकर होत्या. यावेळी, वि.सा. संघाच्या शाखा सचिव रंजना दाते व समन्वयक डॉ. संजय धोटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

नवोदितांच्या या सत्रातील युवा व किशोरवयीन कवयित्रींना सादरीकरणासाठी प्रोत्साहन देत त्यांना खुलविण्याचे काम सूत्रसंचालक अर्चना हरबुडे धानोरकर यांनी केले. या सत्रात अत्यंत आशयसंपन्न, चिंतनशील आणि नव्या विचारांना प्रवाहित करणाऱ्या कविता विद्यार्थिनींनी सादर करीत उपस्थित साहित्यप्रेमींची भरभरून दाद मिळविली. येणारा काळ हा जिल्ह्याचे काव्यदालन अधिक समृद्ध करणारा असेल, याची ग्वाहीच या शालेय व महाविद्यालयीन कवयित्रींनी दिली.

मुक्ताई सावित्रीआई काव्यसत्रात यशवंत महाविद्यालयातील सुहानी वांदिले, राखी भस्मे, दीक्षा अलगुलवार, पल्लवी चंदनखेडे, पूजा खंडाळे, गो.से. वाणिज्य महाविद्यालयातील आकांक्षा हागे, प्रणाली पिंपळे, पायल दामणे, अमृता लोखंडे, प्रणाली पांडे, कुंभलकर समाजकार्य महाविद्यालयातील वैष्णवी अलगुलवार, पायल वरखेडे, मोनाली कोंबे, अश्विनी सोनुले, भाग्यश्री नोकरकर, डॉ. आंबेडकर समाजकार्य महाविद्यालयातील धरती मैद, विद्या हजारे, प्रियांका घुरडे, श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा महाविद्यालय, पिपरी येथील शीतल बिलोणे, मोहिनी बोटकुले, राधा बोबडे, सेवाग्रामच्या कस्तुरबा नर्सिंग महाविद्यालयातील दीपाली गिरी, गांधीग्राम महाविद्यालयातील अश्विनी ढगे, लोक महाविद्यालयातील मुग्धा काळे या युवा कवयित्रींनी दर्जेदार कविता सादर केल्या.


याशिवाय, न्यू इंग्लिश हायस्कूलच्या वृषाली कांबळे, श्रावणी कांबळे, मंजिरी देशमुख, उन्नती गुरनुले, नम्रता भिवगडे, रसिका भगत, इशिका बागेश्वर, पूर्वा लोहकरे, तन्वी सातभरे, सुहानी टेंबरे, केसरीमल कन्या शाळेतील चाहत पेटकर, देवयानी बोरसे, पुलगावच्या इंडियन स्कूल ऑफ स्कॉलर्सची रितिका क्षीरसागर या शालेय विद्यार्थिनींनीही आपल्या कवितेतून परिपक्वेची जाणीव करून दिली.

या सर्व सहभागी नवोदित कवयित्रींना संमेलनाध्यक्ष कवयित्री सुनीता झाडे, विदर्भ साहित्य संघ, नागपूरचे अध्यक्ष प्रदीप दाते, यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख, प्राचार्य डॉ. गिरीश ठाकरे, विदर्भ साहित्य संघाचे शाखाध्यक्ष संजय इंगळे तिगावकर, उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र मुंढे, संयोजक मंजुषा ठाकरे चौगावकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. आभार कविता बेदरकर यांनी मानले.

या सत्राच्या आयोजनासाठी विविध शाळा महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला साहित्यप्रेमींसह विद्यार्थी, शिक्षक व पालकांची उपस्थिती होती.

मासिक पाळी विषयीचे हे गैरसमज ओळखणे गरजेचे

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर





(पुणे) वाघोली : मासिक पाळी, म्हणजेच पीरियड्स ही महिलांच्या शरीरात होणारी एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. परंतु असं जरी असलं तरी त्याबद्दल समाजात अनेक प्रकारचे गैरसमज आणि चुकीच्या समजुती प्रचलित आहेत. आजही, अनेक मुली आणि महिला अशा गोष्टींवर विश्वास ठेवतात ज्यांना कोणताही वैज्ञानिक आधार नसतो. या गैरसमजांमुळे अनेक वेळा त्यांना शारीरिक आणि मानसिक समस्यांनाही तोंड द्यावे लागते. अनेक लोकांचा असा विश्वास आहे की मासिक पाळीच्या वेळी आंघोळ केल्याने रक्तप्रवाह वाढतो किंवा आरोग्यावर वाईट परिणाम होतो, परंतु सत्य हे आहे की यावेळी कोमट पाण्याने आंघोळ केल्याने शरीराला आराम मिळतो आणि वेदना देखील कमी होतात.

काही ठिकाणी, मासिक पाळीच्या वेळी महिलांना स्वयंपाकघरात जाण्यास किंवा स्वयंपाक करण्यास मनाई केली जाते. परंतु याला कोणताही वैज्ञानिक आधार नाही. आधीच्या काळातील लोकांनी ही परंपरा काही विचारांनी सुरू केली जी नंतर रूढीवादी विचारसरणीत रूपांतरित झाली जी बदलण्याची गरज आहे. अनेक मुलींना असे वाटते की मासिक पाळी दरम्यान व्यायाम केल्यामुळे त्यांच्या आरोग्याला हानी पोहोचू शकते, परंतु हलके व्यायाम आणि योगा केल्याने शरीरात रक्ताभिसरण योग्य राहण्यास मदत होते आणि वेदनांपासून आराम मिळतो. अनेकांचा असा विश्वास असतो की यावेळी केस धुण्यामुळे डोकेदुखी होऊ शकते किंवा आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो, परंतु असे काहीही घडत नाही.

मासिक पाळीच्या काळात स्वच्छता राखणे आणि स्वतःला ताजेतवाने ठेवणे खूप महत्वाचे आहे. मासिक पाळीच्या दरम्यान सौम्य वेदना होतात हे खरे आहे, परंतु जर वेदना खूप जास्त असतील किंवा नेहमीपेक्षा जास्त दिवस राहिल्या तर त्याकडे दुर्लक्ष करू नये. अशा परिस्थितीत, नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

- डॉ. सुजाता दिपके, वाघोली, पुणे.

लग्नानंतर मासिक पाळी आपोआप नियमित होते हा देखील एक गैरसमज आहे. अनियमित मासिक पाळी ही अनेक कारणांवर अवलंबून असते, जसे की हार्मोनल असंतुलन, ताणतणाव, खाण्याच्या चुकीच्या सवयी इत्यादी.

- डॉ. अमृता कोटांबे, वाघोली, पुणे.

विदर्भ साहित्य संघाचे कवयित्री संमेलन ; वैविध्यपूर्ण कविता सादर करीत साजरा झाला काव्योत्सव

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : विदर्भ साहित्य संघ, वर्धा शाखेद्वारे जागतिक महिला दिनानिमित्त यशवंत महाविद्यालयात आयोजित कवयित्री महासंमेलनातील तीन सत्रात ज्येष्ठ, प्रथितयश व युवा कवयित्रींनी वैविध्यपूर्ण काव्यसादरीकरण करीत 'काव्योत्सव स्त्रियांचा' उत्साहात साजरा केला.

या एक दिवसीय कवयित्री संमेलनातील डॉ. सुनीता कावळे स्मृती काव्यसत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. नूतन माळवी लाभल्या होत्या. या सत्राचे सूत्रसंचालन कविता बेदरकर यांनी केले. यावेळी ज्येष्ठ कवयित्री सुलभा चौधरी, नंदा कुलकर्णी, मीनल रोहणकर, जयश्री कोटगीरवार, डॉ. सुरेखा गोडबोले दुबे, डॉ. वर्षा पुनवटकर, डॉ. रेखा बोबडे, कल्पना पांडे माळोदे, छाया राडे, अर्चना भोमले, शांता पावडे, कल्पना लांडगे, माधुरी वरवटकर यांनी मराठी व हिंदी काव्यरचना सादर करीत काव्यमैफलीत रंगत आणली. या सत्रात कवी प्रशांत पनवेलकर यांच्या हस्ते कवयित्रींचे स्वागत करण्यात आले.

दीपमाला कुबडे स्मृती काव्यसत्राचे अध्यक्षस्थान लेखिका सना पंडित, नागपूर यांनी भूषविले. काव्योत्सवाच्या संयोजक मंजुषा ठाकरे चौगावकर यांनी या सत्राचे सूत्रसंचालन केले. या सत्रात विद्या कळसाईत, ज्योती भगत, सुषमा पाखरे, अर्चना हरबुडे धानोरकर, प्रा. मंदा तरंगे चौधरी (पुलगाव), कांचन कानतोडे, नंदिनी बर्वे, निशा काळे, राखी मेने, कविता खुरपडे, हर्षा मरस्कोल्हे यांनी एकापेक्षा एक सरस अशा कविता सादर केल्या. यावेळी समीक्षक डॉ. पुरुषोत्तम माळोदे व प्रा. शेख हाशम यांच्या हस्ते कवयित्रींना सन्मानित करण्यात आले.

काव्योत्सवातील सुमती वानखेडे स्मृती काव्यसत्र नागपूरच्या धनश्री पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. गझलकार प्रीती तडस वाडीभस्मे यांनी या काव्यसत्राची सूत्रे सांभाळली. यावेळी सुषमा पाखरे, सुनिता भुरकुंडे (पुलगाव), सुचिता बुधे, शुभांगी पोकळे, डॉ. निलांबरी सदन, पल्लवी पुरोहित यांनी वैविध्यपूर्ण कवितांचे सादरीकरण केले. वि.सा. संघ शाखेचे सहसचिव प्रा. पद?माकर बाविस्कर यांनी सर्व सहभागी कवयित्रींचे आभार मानले. या काव्योत्सवाला संमेलनाध्यक्ष सुनीता झाडे, विदर्भ साहित्य संघाचे शाखाध्यक्ष संजय इंगळे तिगावकर, सचिव रंजना प्रदीप दाते, पदाधिकारी डॉ. राजेश देशपांडे, प्राचार्य मीनल रोहणकर, समन्वयक डॉ. संजय धोटे, प्रभाकर उघडे, प्रा. कमलाकर चौधरी, माधवी साबळे, सुभाष कुबडे, आशा निंभोरकर, राजेंद्र कळसाईत, संगीता इंगळे, डॉ. आरती प्रांजळे घुसे, योगेश बडे, कौस्तुभ कुबडे, संघर्ष डहाके यांच्यासह साहित्यप्रेमींची उपस्थिती लाभली होती.

कामठीचा वाढता विस्तार लक्षात घेता उभारले जाणार स्वतंत्र उपायुक्त कार्यालय: पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : कामठी शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणात होत असून या विस्ताराला योग्य सुरक्षा व दिशा देण्याच्या दृष्टीने अद्ययावत सर्व सुविधापूर्ण स्वतंत्र पोलिस उपायुक्त कार्यालय उभारले जाणार आहे. या कार्यालयात कामठीतील सर्व सीसीटीव्ही कॅमे-याचे कंट्रोल रूम, वॉर रूम, एसीपी कार्यालय, पोलिस स्थानक, पार्किंगच्या सुविधेसह आदर्श ठरेल या पद्धतीने नियोजन करण्याचे निर्देश महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

सदर येथील जिल्हा नियोजन भवन येथे कामठी मेट्रो फेज २ विस्ताराच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी नियोजन संचालक अनिल कोकाटे, मेट्रोचे प्रकल्प संचालक राजीव त्यागी, पोलिस उपायुक्त नचिकेत कदम, उपविभागीय अधिकारी सचिन गोसावी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नवीन कामठी पोलिस मेट्रो स्टेशनच्या प्रस्तावाबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली.

तळमजला अधिक दोन मजले अशा स्वरूपात नवीन पोलिस उपायुक्त कार्यालय उभारले जाईल. याच्या निधीबाबत मेट्रोच्या निकषानुसार उपलब्धता करून देण्याचे निर्देश पालकमंत्री बावनकुळे यांनी मेट्रोला दिले. प्रस्तावित कन्हान मेट्रो विस्तारीकरणाबाबतही या बैठकीत चर्चा करण्यात आली.

कन्हान येथे मेट्रो स्टेशननजीक उभारले जाणार दहा मजली व्यापारी संकुल

कन्हान येथे प्रस्तावित मेट्रो प्रकल्पासाठी कामठी नगरपरिषदेच्या जागेचा योग्य विनियोग व्हावा व स्थानिक व्यापा-यांना व्यवसायासाठी संधी उपलब्ध व्हावी या दृष्टीने हे मेट्रो स्टेशनच्या बाजुला बाजुला एकत्र व्यावसायिक संकुल उभारण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करण्याचे निर्देश या बैठकीत पालकमंत्री बावनकुळे यांनी दिले. हे व्यापारी संकुल दहा मजली असावे. यात दोन मजले हे पार्किंगसाठी, एक मजला आटोमोबाईल सेक्टर, दुसरा मजला कापड बाजारपेठ, भाजीपाला मार्केटसाठी स्वतंत्र मजला यासह इतर व्यावसायांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल, असे ते म्हणाले. या व्यापारी संकुलाच्या आराखड्यात सर्व बाबींचा विचार व्हावा असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रत्येक तालुक्यात बांधकाम कामगारांसाठी होणार सुरक्षा किट वाटप शिबिर

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबईत अंतर्गत कामगारांच्या कल्याणासाठी शासन कटिबद्ध आहे. प्रत्येक कामगारांना कामाच्या ठिकाणी सुरक्षा किट असावे, त्यांच्या रोजच्या उपजीविकेसाठी लागणारी आवश्यक भांडे मिळावे यादृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. यात एकाच ठिकाणी शिबिर आयोजित केल्यास पात्र व अपात्र लाभार्थ्यांमध्ये शंकेचे वातावरण निर्माण होऊ शकते. हे लक्षात घेता ख-या पात्र लाभार्थ्यांपर्यंत शासनाची ही योजना प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुका पातळीवर किमान तीन दिवसाचे शिबिर आयोजित करण्याचे निर्देश महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कामगार विभागाला दिले.

प्रत्येक पात्र कामगारांना वाटपापूर्वी संपर्क साधून त्यांना वेळ व दिनांक मेसेजद्वारे कळविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकीत भूमी अभिलेख विभागाचा आढावा घेण्यात आला. अनेक लोकांच्या जमिन मोजणीबात तक्रारी आहेत. या तक्रारीचे तत्काळ निवारण व्हावे यादृष्टीने भूमी अभिलेख कार्यालयाद्वारे याचे एक निश्चित वेळापत्रक करून तालुकानिहाय मोजणी मोहीम हाती घेण्याचे निर्देश त्यांनी दिले.

विघ्नहर मंदिरासमोर होळी उत्सव उत्सहात साजरा

जुन्नर ■ सचिन थोरवे



जुन्नर : अष्टविनायकांतील मुख्य स्थान असलेल्या श्री क्षेत्र ओझर येथे विघ्नहर मंदिरासमोर होळीचा सन उत्सहात साजरा करण्यात आला . श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब कवडे विश्वस्त समीर मांडे महिला विश्वस्त शिल्पाताई जगदाळे माजी अध्यक्ष मुरलीधर घेगडे व्यवस्थापक अशोक घेगडे ग्रामस्थ सुदाम मांडे, भास्कर रोकडे व भाविक गणेशभक्त यांच्या उपस्थितीत पुजापाठ करून मंत्रोच्चारात होळी साजरी करण्यात आली . अध्यक्ष बाळासाहेब कवडे यांच्या शुभहस्ते होळी पेटविण्यात आली . यावेळी उपस्थित पदाधिकारी , ग्रामस्थ व गणेशभक्तांनी होळीला अभिवादन केले . देवस्थानच्या महिला विश्वस्त शिल्पाताई जगदाळे , ग्रामपंचायत सदस्या सुमन प्रकाश मांडे व सौ रोकडे यांनी होळीला पुरण पोळीचा नैवद्य अर्पण केला . होळीसाठी आवश्यक असणारे साहित्य श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थ यांनी आणले होते शेकडो भाविकांनी नारळरूपी समिधा होळीला अर्पन केल्या . सर्व कार्यक्रमाचे नियोजन देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष , उपाध्यक्ष , सचिप , खजिनदार , विश्वस्त व कर्मचारी वर्गाने केले होते .

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242